ISSN: 0974-3065

# सभासद बखरीत शिवरायांच्या अलौकिक व्यक्तिमत्त्वाचे वर्णन

डॉ. किशोर पाठक
सहयोगी प्राध्यापक
मराठी विभाग प्रमुख
पंकज कला व विज्ञान महाविद्यालय, चोपडा

इतिहासाचे पुनरावलोकन करण्यासाठी बखर हा अत्यंत महत्त्वाचा साहित्य प्रकार आहे. बखरीच्या माध्यमातून आपल्याला इतिहासातील वैभवाचे अवलोकन करता येते. बखर लेखनाचा आढावा घेतला तर शिवपूर्वकाळात बखर लेखन हे मोठ्या प्रमाणात झालेले दिसत नाही. पण असे असले तरी या काळात 'महिकावतीच्या बखरीचे' लेखन झाले आहे. बखर लेखनाच्या संदर्भात आपल्याला जाणवते की, बखरीचा संबंध हा इस्लामी राज्यकर्त्यांच्या 'अखबारी' व 'तवारिख' यांच्याशी दिसून येतो. अरबी भाषेतील 'खबर' या शब्दापासून 'बखर' हा शब्द तयार झाला असे काही अभ्यासक मानतात. पण असे असले तरी इस्लामी राज्यकर्त्यांनी 'तवारिख' व 'अखबारी' लेखन करून त्यात इतिहास लेखन केले. त्यानुसारच महाराष्ट्रात देखील बखर लेखनाला सुरुवात झाली असावी. मराठीत शिवाजी महाराजांच्या पराक्रमाचे वर्णन करणाऱ्या '९१कलमी बखर किंवा शेडगावकर बखर', 'चित्रगुप्ताची बखर' इत्यादी बखरींचे लेखन झाले आहे.

सभासद बखरीत शिवाजी महाराजांच्या चरित्राचे वर्णन आले आहे. याविषयी डॉ. यु. म. पठाण लिहितात, "शिवचरित्रविषयक प्रमाण बखरींमध्ये 'सभासद बखरी' चे जसे एक महत्त्वपूर्ण आणि अनन्यसाधारण स्थान आहे. तसेच ते मराठी बखर वाङ्मयातही आहे. तिच्यामधून शिवरायांच्या व्यक्तिमत्वाचे दर्शन घडते. तद्वतच शिवकालीन स्थितीगतीचेही दर्शन घडते. शिवकालीन भाषा व इतिहास यांच्या संदर्भातही तिचे मोल लक्षणीय आहे."[1] सभासद बखरीचे महत्व थोडक्यात सांगितले आहे. राजाराम महाराजांनी कृष्णाजी अनंत सभासद यांना आज्ञा केली, "आपले पिते थोरले राजे यांणी इतका पराक्रम केला व चार पातशाहींशी दावा लाविला, ऐसा पराक्रम केला........ तुम्ही पुरातन, राज्यातील माहीत (गार) लोका आहां. तरी इस्तकबिलापासून चरित्र लेहून देणे."[२] त्यानुसार शिवाजी महाराजांच्या पराक्रमाचे वर्णन सभासद यांनी या बखरीत केले आहे. या बखरीतून शिवाजी महाराजांच्या अलौकिक व्यक्तिमत्त्वाचे वर्णन पुढीलप्रमाणे घडत असते.

शिवाजी महाराजांनी शून्यातून विश्व निर्माण केले. त्यांनी आपल्या स्वकर्तुत्वावर हिंदवी स्वराज्याची निर्मिती केली. संघटन कौशल्य हा गुण महाराजांमध्ये होता. म्हणूनच त्यांनी मावळ्यांना एकत्र केले. व त्यांच्या मनात हिंदवी स्वराज्याची जाणीव निर्माण केली. चार बादशहानंशी लढा देत आपले राज्य निर्माण केले. त्यांच्या संघटन कौशल्य या गुणांची जाणीव सभासद बखरीत दिसून येत असते. शिवाजी महाराज प्रत्येक मोहीम ही आपल्या सहकाऱ्यांना विश्वासात घेऊन मोहिमेची आखणी करत होते. म्हणूनच अफजलखान वधाच्या वेळी महाराजांनी सर्वांना सांगितले की, "श्री प्रसन्न जाहाली. आता अफजलखान मारून गर्दीस मेळवितो."[३]



Scanned with OKEN Scanner

महाराज हे कोणतेही कार्य करत असताना विचारपूर्वक त्या कार्याची आखणी करत होते. जोपर्यंत कार्य पूर्ण होत नाही तोपर्यंत ते त्याचा पाठपुरावा करत होते. थोडक्यात कोणत्याही कठीण प्रसंगात ते डगमगत नव्हते, तर आलेल्या कठीण प्रसंगाला ते मोठ्या धैर्याने तोंड देत होते.

सभासद बखरीतून शिवाजी महाराजांच्या मुत्सद्देगिरीची जाणीव होत असते. जसा प्रसंग असेल त्याप्रमाणे ते वागत होते. कधी कधी ते माघार घेवून तह देखील करत असत. त्यातून त्यांच्या दूरदर्शीपणाची जाणीव आपणास होत असते. पुरंदरच्या तहात त्यांच्या दूरदर्शीपणा याची जाणीव होते. शिवाजी महाराज व मिर्झाराजा जयसिंग यांच्या भेटीत राजे सांगतात, " तुम्हांस जे गड पाहिजे ते आपण देतो. दिलेरखानास बोलावून आणवणे. पूरंधर तुम्हांस देतो. निशाण तुमचे चढवितो........"[४] थोडक्यात महाराजांनी काही वेळा आपल्या हिंदवी स्वराज्याच्या रक्षणासाठी तह केला, व त्यातून त्यांच्या मुत्सद्देगिरीची जाणीव आपणास होत असते.

शिवाजी महाराजांनी जमीन मोजण्याची पद्धत सुरू केली. त्यानुसार शेतसाऱ्याची आकारणी त्यांनी केली. त्यांनी हिंदू मुस्लिम असा कोणताही भेद न करता देव देवस्थानात दिवाबत्ती, नैवेद्य, अभिषेक याची सोय केली होती. त्यांनी, "मुसलमानांचे पीर मसिदी त्यांचे दिवाबत्ती नैवेद्य स्थान पाहून चालवले."[५] असे करत असताना त्यांनी कोणताही भेद न करता सर्वांना समान पद्धतीने ते वागवत होते. याची जाणीव यातून आपणास होत असते. कर्तबगार शासक म्हणून देखील महाराजांची जाणीव सभासद बखरीत आपल्याला होते.

महाराज हे जसे आदर्श राजे आहेत तसेच ते आदर्श पुत्र ,आदर्श भाऊ, आदर्श पिता देखील आहेत. आदिलशाही विरोधात, महाराजांनी उठाव केला. त्यावेळी शहाजीराजांना याविषयी विचारले तेव्हा ते सांगतात , "शिवाजी आपला पुत्र, परंतु आपणा जवळून पळोन गेला. तो आपल्या हुकुमात नाही........ शिवाजी आपला पुत्र याजवरी हल्ला करावी. मन मानेल ते करावे, आपण दरम्यान येत नाही."[६] असे शहाजीराजांनी सांगितल्यावर महाराज वेळोवेळी त्यांना पत्र पाठवून त्यांची विचारपूस करत होते. व्यंकोजी हा शिवाजी महाराजांचा सावत्र भाऊ होता. त्यांच्याकडे शहाजीराजांची बिरुदे होते. आपल्याकडे ती बिरुदे असावीत म्हणून ते व्यंकोजीच्या भेटीला जातात. पण त्यावेळी व्यंकोजी पळून जातो. तेव्हा महाराजांना वाटते बिरुदे द्यायची नव्हती, तर नको पण पळून जाण्याचे कारण नव्हते. शेवटी लहान तो बुद्धीने ही लहानच राहिला. असे सांगून ते व्यंकोजीचा राज्याचे रक्षण करायला सांगतात. यात त्यांचे आदर्श भाऊ या व्यक्तिमत्त्वाची आपल्याला जाणीव होत असते.

महाराज हे आदर्श पिता देखील आहेत. याची ओळख संभाजी महाराजांना मथुरेस निराजी पंतांकडे सोडतांना होत असते. या प्रसंगाचे वर्णन बखरकाराने अतिशय प्रभावीपणे केले आहे. महाराजांना संकटप्रसंगी भवानी स्वप्नात दृष्टांत देत होती. व त्यानुसार ते आपले काम करत. त्यात त्यांना यश मिळत होते. याची जाणीव सभासद बखरीत 'अफजलखानाचा वध', 'शाहिस्तेखानाचे परिपत्य' या महत्त्वपूर्ण अशा प्रसंगातून होत असते. 'श्री करेल ते खरे' ही त्यांची निष्ठा होती. त्यानुसारच ते आपले कार्य करत होते. व त्यात यश संपादन करत होते .

थोडक्यात 'सभासद बखरीत' कृष्णाजी अनंत सभासद यांनी शिवाजी महाराजांचे वर्णन अतिशय प्रभावी असे केले आहे. महाराजांचे आगळेवेगळे व्यक्तिमत्त्व वाचकांसमोर उभे केले आहे. शिवाजी महाराजांचे विविध गुणवैशिष्ट्यांचे दर्शन देखील येथे घडवले आहेत. या बखरीतून



Scanned with OKEN Scanner

ISSN: 0974-3065

शिवकालीन समाजजीवनाचे अवलोकन देखील चांगल्या प्रकारे करता येते. सभासद बखरीतून महाराजांनी सर्व धर्म समभाव पद्धतीने कसे वागत हे आपल्याला जाणवत असते. महाराज हे प्रजाहितदक्ष होते. म्हणून प्रजेची काळजी ते आधी घेत होते.

सभासद बखरीत कृष्णाजी अनंत सभासद यांनी व्यक्ती वर्णन, प्रसंग वर्णन व स्थळ वर्णने देखील अतिशय प्रभावी अशी केली आहेत. या सर्व वर्णनातून शिवाजी महाराजांच्या वेगळेपणाचे दर्शन सभासदांनी घडवले आहे. थोडक्यात ही बखर शिवाजी महाराजांच्या जीवनावर महत्त्वपूर्ण असा प्रकाश टाकणारी बखर आहे.

संदर्भ


१) पठाण यु. म., संपा सभासद बखर, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, तृतीयावृत्ती २००५ मनोगत
२) तत्रैव पृ. क्र. ७
३) तत्रैव पृ. क्र ४१
४) तत्रैव पृ. क्र ६५
५) तत्रैव पृ क्र ५६
६) तत्रैव पृ क्र ४०




Scanned with OKEN Scanner

KPP.
2021.22

Kala Sarovar
(UGC Care Group-1 Journal)
ISSN: 0975-4520
Vol-25 No.01(I) January-March 2022

# दुर्गा भागवत यांचे ललित गद्य लेखन

डॉ किशोर पाठक
सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग प्रमुख, पंकज कला व विज्ञान महाविद्यालय,चोपडा
ईमेल-karuna.kishor@gmail.com

दुर्गा भागवत या ललितसाहित्य लेखन करणाऱ्या महत्त्वाच्या लेखिका होत्या. त्यांनी आयुष्यभर लेखनकार्य केले. ते लेखनकार्य करत असतांना स्वतःशी बांधिलकी ठेवून त्यांनी हे कार्य केले. त्यांनी कायमस्वरूपी सत्यनिष्ठा, मूल्यनिष्ठा, निर्भयता यांची कास धरून लेखन केले. त्यांच्या लेखनाचा आवाका मोठा होता . दुर्गा भागवत यांनी आयुष्यभर अक्षरांचे श्रम करत अक्षरसाहित्यनिर्मिती केली. हे त्यांच्या एकूण लेखनातून दिसून येते. दुर्गा भागवत या सदैव ज्ञानसाधना करणाऱ्या लेखिका होत्या. त्यामुळे त्यांनी लेखनकार्य अविरत केले आहे. त्यांनी अनेक विषयांवर लेखन केले. असे असले तरी निसर्गावर भरपूर लेखन केले आहे. त्यांनी निसर्गाचे वर्णन आपल्या लेखनातून जिवंत असे केले आहे. त्यांना वाटते की , 'विद्या ही सर्वत्र असते. ती निसर्गाने मला शिकवली आहे.' यातून निसर्गाशी त्यांचे जिव्हाळ्याचे नाते आहे हे जाणवते. दुर्गा भागवत यांना निसर्ग व मानवीसृष्टी यांच्या विषयी कुतूहल वाटते . त्यातूनच त्यांना नवीन विषय अभ्यासासाठी मिळत गेले. त्यांना अनेक भाषा येत होत्या. त्यामुळे त्यांनी आपल्या लेखनातून अनेक भाषांचा अभ्यास केला. हे लेखनकार्य करत असताना आपल्या आजूबाजूच्या समाजात घडणाऱ्या घटनांची माहिती त्या घेतात. व त्या विषयी आपल्या प्रतिक्रिया वेळोवेळी देत असतात. म्हणून त्यांच्याविषयी महेश एलकुंचवार म्हणतात , "भल्याभल्यांना त्यांच्याशी मैत्री आहे असे सांगण्यात मोठेपणा वाटतो." १ यात दुर्गा भागवत यांचे लेखन क्षेत्रातील मोठेपण नेमक्या शब्दात वर्णन केले आहे.

दुर्गा भागवत यांनी विविध विषयांवर लेखन केले. त्यात लोकसाहित्य, ललित साहित्य इ.विषयावर विपुल लेखन त्यांनी केले. त्यात ललित लेखन महत्त्वाचे आहे. दुर्गा भागवत यांच्या लेखनाची उंची ललित लेखनाने अधिक वाढली आहे. त्यांच्या ललित लेखनात त्यांनी पुढील लेखन केले आहे. त्यात 'ऋतुचक्र' (१९५६), 'भावमुद्रा' (१९६०), 'व्यासपर्व' (१९६२), 'रुपरंग' (१९६७), 'पैस' (१९७०), 'डूब' (१९७५), 'प्रसंगिका' (१९७५), 'लहानी' (१९८०), 'आठवले तसे' (१९९१) 'दुपानी' (१९९५) 'गोधडी' (१९९६) 'खमंग' (२०००) यांचा समावेश होतो. दुर्गा भागवत यांच्या ललित लेखनाविषयी प्रभा गणोरकर म्हणतात, " त्यांच्या ललितलेखनातून सतत दिसत राहतो तो जीवनाला सर्व बाजूंनी कवेत घेऊ पाहणारा, त्यांचा तळ शोधू पाहणारा एक मनस्वी कलावंत. या कलावंताचे समृद्ध मन त्यातील शब्दाशब्दातून व्यक्त होत राहते. वाचकालाही ते समृद्ध करीत जाते." [२] त्यांच्या ललित लेखनातून त्यांनी विविध विषय हाताळले आहेत त्यांच्या ललित लेखनाचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येतो.

दुर्गा भागवत यांचे मन निसर्गात रमते. त्यांच्या भाववृत्ती आणि अंतःचक्षूने जे पाहिले, मनाने जे अनुभवले त्याचे एकत्रीकरण झाले की, एक वेगळेच तंत्र त्यातून साकारते. ललित निबंधामध्ये तंत्रापेक्षा भाववृत्ती त्यांना महत्त्वाची वाटते म्हणून, "कवितेप्रमाणेच ललित लेखनाला भाववृत्तीत डूब घेण्याची आवश्यकता असते. किंबहुना भाववृत्ती नसेल तर सृजनाचा अंकुर उगवणार नाही."[३] असे त्यांनी अनुभवातून सांगितले आहे. असे असले तरी त्यांचे ललित लेखन याच प्रेरणेतून झाले आहे. त्यांनी आपल्या 'ऋतुचक्र' या पुस्तकात निसर्ग दर्शन घडवले आहे. त्यात अतिशय सूक्ष्मपणे



Scanned with OKEN Scanner

ISSN: 0975-4520
Vol-25 No.01(1) January-March 2022

निसर्गाच्या बदलत जाणाऱ्या रूपाचे वर्णन केले आहे. या पुस्तकातून अनेक फुले, पाने , झाडे यांचे वर्णन त्यांनी केले आहे. त्या म्हणतात, "आम्ही निसर्गापासून दूर गेलो तरी निसर्ग आमचा पाठपुरावा करतोच आहे. ऋतुच्या रूपाने तो प्रकट होतो."[४] या ऋतूचे त्यांना जसे दर्शन घडले तसे त्यांनी वाचकांना घडवले. या पुस्तकातील प्रत्येक महिन्याला त्यांनी वेगवेगळी विशेषणे दिली आहेत. उदा. 'सोनेरी अश्विन', 'तालबद्ध पौष' इ. या प्रत्येक लेखातून त्यांनी त्या महिन्याचे सौंदर्य उलगडून दाखवले आहे. या लेखातून त्यांच्या काव्यात्मकदृष्टीची जाणीव वाचकांना होत असते. 'ऋतुचक्रात' प्रत्येक महिन्याला अर्थपूर्ण असे शीर्षक देऊन त्यांचे वैशिष्ट्ये वाचकांना सांगितले आहे. या पुस्तकातून त्यांनी निसर्गाचे सूक्ष्म निरीक्षण करून त्यातून निसर्ग आणि मानवी जीवनाचा संबंध घडवला आहे. 'ऋतूचक्र' या पुस्तकात दुर्गा भागवत यांनी वाचकांना निसर्गाशी समरस केले आहे.

'भावमुद्रा' व 'रुपरंग' या दोन पुस्तकात त्यांनी व्यक्तीचित्रांचे वर्णन केले आहे. ही वर्णने करत असताना ती निरनिराळी अशी केली आहेत. शाळेत संस्कृत शिकवणाऱ्या शिक्षकांचे वर्णन तसेच पुत्रप्रेमाने आंधळी झालेल्या गंगा चे वर्णन त्यांनी केले आहे. अशिक्षित असूनही विचाराने अतिशय चांगल्या अशा रुक्मिणीबाईचे वर्णन यात आले आहे. मूल वाचत नाही म्हणून कुत्र्यावर प्रेम करणारी आलू ही स्त्री सुद्धा त्यांनी साकारली आहे. हंसाचे मोनालिसा सारखे हास्यामुळे तिचे स्वरूप कसे बदलते हे दाखवले आहे. शीवच्या म्हाताऱ्याने त्यांच्या त्यांच्या मनात लहानपणीच कशी भीती निर्माण केली हे त्यांनी 'भावमुद्रेतून' सांगितले आहे. आबा आपला स्वार्थ नेहमी साधतात हे त्यांनी दाखवले. गुप्त बातम्या काढून जीवन जगणारा बंडू कदम त्यांनी वर्णन केला. वाचून काही साध्य होत नाही हे भास्करला कसे समजते हे सुद्धा त्या सांगतात. वडिलांपासून लांब राहणारी मुलं ही त्या वर्णन करतात. अशाप्रकारे या दोन पुस्तकातून त्यांनी व्यक्तीवर्णने करताना विविध स्वरूपाची अशी वर्णने केली आहेत.

दुर्गा भागवत यांना भेटलेल्या अनेक व्यक्तींचे जणू त्यांनी शब्दचित्र त्यांच्या लेखनातून रेखाटले आहे. त्यातील काही लेखातून निसर्गाच्या विषयीचे वर्णन 'भावमुद्रेत' आले आहे. हे वर्णन वाचताना दुर्गा भागवत यांच्या व्यासंगाची जाणीव होते. हे लेखन अनुभवातून साकारले आहे. 'टोक टोक टोक' या लेखात पावसाळ्यात तांबड पक्षाचा टोक टोक टोक असा आवाज हा पुस्तकाच्या कपाटातून येत आहे असा त्यांना भास होतो. दुर्गा भागवत यांनी जॅक्सन विषयी सुद्धा येथे सांगितले आहे. 'फिकट पिवळे पीस' यात सकाळची अकराची वेळ त्यांना कंटाळवाणी वाटते पण अकराच्या वेळेच्या बोलक्या अशा अनुभवाचे वर्णन यात केले आहे. 'सावल्या' मध्ये मध्यरात्री खिडकीतून बघितल्यानंतर ढगाच्या जाणवणाऱ्या वेगळा सावल्यांचे वर्णन त्यांनी केले आहे. 'मत्स्यमहालात' यात नवजात अर्भकाचे वर्णन केले आहे. 'चिरदाह' मध्ये कंदबाच्या झाडाचे वर्णन आले आहे. ते कंदबाचे भव्य झाड तुटल्याने त्यांना झालेल्या दुःखाचे वर्णन यात येते. याशिवाय 'ज्ञानशालेच्या द्वारापाशी' यात रखवालदार म्हणून काम करणाऱ्या महमुदचे वर्णन केले आहे. या लेखातून व्यक्ती वर्णने आली आहेत.

दुर्गा भागवत यांनी 'व्यासपर्वात' महाभारतातील महत्त्वाच्या पात्रांचे वर्णन केले आहे. या व्यक्तींशी त्यांनी संवाद साधला आहे. त्यातील 'पूर्णपुरुष श्रीकृष्ण' यात श्रीकृष्णाचे वर्णन करताना श्रीकृष्णाला त्या पूर्ण पुरुषांची उपमा देतात. 'मोहरील ठिणगी' यात एकलव्याचे वर्णन केले आहे. 'कोंडलेले क्षितिज' यात अश्वस्थामाचे वर्णन केले आहे. अश्वस्थामा हा आपल्या विचारात कसा दाबला गेला हे त्यांनी सांगितले. 'व्यक्तिरेखा हरवलेला माणूस' यात दुर्योधनाचे वर्णन आले आहे. ' एकाकी' मध्ये कर्णाचे वर्णन त्या करतात. 'परीकथेतून वास्तवाकडे' यात अर्जुनाचे 'मुक्त पथिक' यात युधिष्ठराचे वर्णन येते. 'अश्रू हरवल्यावर' यात पितामह भीष्म यांचे वर्णन आले आहे. 'कामिनी' यात



Scanned with OKEN Scanner

 ISSN: 0975-4520
Vol-25 No.01(I) January-March 2022

द्रोपदीचे वर्णन केले आहे.

'रूपरंग' हे दुर्गा भागवत यांचे व्यक्तिचित्रणात्मक पुस्तक आहे. या पुस्तकात स्त्री व पुरुष यांची वर्णने केली आहेत. यात त्यांनी ओघवत्या अशा भाषेचा वापर केला आहे. त्यामुळे ही वर्णने वाचकांना जिवंत असे वाटतात. या व्यक्तींचे वर्णन करताना त्यांच्याशी संबंधित कथा-घटना-प्रसंग वातावरण यांच्याद्वारे ही वर्णने केली आहेत. कुठे तरी भेटणार या अशा सामान्य माणसांचे वर्णन या पुस्तकात आले आहे. या व्यक्ती वर्णनात त्यांना किंवा इतरांना जे अनुभव आले त्यातून ते वर्णन केले आहे.

दुर्गा भागवत यांचे ललित गद्य लेखनातील महत्त्वाचे पुस्तक म्हणजे 'पैस' . या पुस्तकात विविध विषयांवर लेखन केले आहे. 'स्वच्छंद' या लेखात दुर्गा भागवत आपल्या लेखन प्रक्रियेचे वर्णन करतात. 'पैस' मध्ये ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरी ज्या खांबाला टेकून दिली त्या खांबाच्या दर्शनाने त्यांच्या मनात आलेल्या विचारांचं वर्णन त्या करतात. 'पंढरीचा विठोबा' यात पंढरपूरचा विठोबा विषयी धनगराने सांगितलेली लोककथा सांगितली. विठ्ठल व रुक्मिणीची मंदिरे वेगवेगळी का झालीत? हे सांगितले आहे. 'जोगवा' यात दुर्गा भागवत यांना एकदा बस मध्ये बसले असताना जेव्हा त्यांना हिजडे वेश्यांकडे जोगवा मागताना दिसतात त्याचे वर्णन आले आहे . 'द्वारकेचा राणा' यात द्वारके संबंधि आलेल्या अनुभवाचे वर्णन केले आहे. 'यमुना कालिंदी' यात कृष्ण कथांमुळे हिंदू मुलांना यमुना आपली नदी वाटते. या यमुनेच्या काठावरी कदंब व कृष्ण कथा आपल्याला माहीत आहे. तरी यमुनाही नेहमी परिचित असली तरी दुःखातल्या सर्व भावछटा दुर्गा भागवत यांना कालिंदी मध्ये दिसतात. 'नैनीच्या पुलावर' हे प्रवासवर्णन आहे. 'महेश्वरची महाश्वेता' यात महेश्वरी लुगड्याची त्यांना असलेल्या आवडीचे वर्णन आले आहे. या सोबतच अहिल्याबाई होळकर यांच्या चरित्राचा ही आढावा घेतला आहे. 'ख्रिस्त संगत' मध्ये लहानपणी ख्रिस्त प्रार्थनेचा त्यांच्या मनावर झालेल्या संस्कारांची वर्णन आले आहे. 'उनपारखी' मध्ये चैत्रातल्या उन्हाचे वर्णन केले आहे. 'आसन्नमरण काळीराणी' मध्ये काळ्या राणीची शोककथा सांगितली आहे. 'बुद्ध प्रलोभन' मध्ये बुद्धाच्या चेहऱ्यावरील शांत भावाची वैशिष्ट्ये सांगितली आहेत. 'पैसे' या संग्रहातून विविध विषयांवर दुर्गा भागवत यांनी लेखन केले आहे. त्यातून त्यांचे वेगळेपण जाणवते. 'पैस' मध्ये त्यांनी वेगवेगळ्या विषयांवर लेखन करताना सखोल असे चिंतन केले आहे.

'डूब ' हा दुर्गा भागवत यांचा लेख लेख संग्रह आहे . या संग्रहात २१ लेख आहेत. या पुस्तकात दुर्गा भागवत यांनी निसर्ग वर्णन केले आहे . या सोबतच आत्मचिंतनात्मक लेखन केले आहे . काही ठिकाणी लोकसाहित्यातून लेखन केले. तर काहीत अनुवाद केला आहे. या लेखातून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विविध अशा पैलूंचे दर्शन घडते. या पुस्तकातील काही लेखातून समाज चिंतनात सोबत सामाजिक-राजकीय घटनांनी अस्वस्थ होणाऱ्या त्यांच्या मनाची वाचकांना ओळख होते. त्यांच्या आयुष्यातील काही घटनांचे वर्णन मोकळेपणाने त्यांनी यात केले आहे. या पुस्तकातून त्यांच्या विविधांगी अशा व्यक्तिमत्त्वाचे दर्शन वाचकांना घडत असते. 'प्रासंगिका' या लेखसंग्रहात आत्मनिवेदन पर एकूण तेरा लेख आहेत. हे लेखन आत्मनिवेदनपर असे आहे. यात दुर्गा भागवत यांच्या जीवनात घडलेल्या प्रसंगाचे वर्णन आले आहे. या पुस्तकाची भाषा शैली सुंदर असल्याने त्याचे वेगळेपण वाचकांना जाणवत असते. या लेखसंग्रहात त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील वेगळेपण लक्षात येते. यात काही ठिकाणी त्यांच्या जीवनातील घटनांचे वर्णन करतात काही वेळा घरातील अनुभव सांगतात.

'मुक्ता' हे दुर्गा भागवत यांच्या भाषण संग्रह चे पुस्तक आहे. त्यांच्या भाषणांचे संकलन केले आहे. आणीबाणीच्या काळात कऱ्हाड येथे झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून केलेले



Scanned with OKEN Scanner

ISSN: 0975-4520
Vol-25 No.01(I) January-March 2022

भाषण यात संग्रहात आहेत. आणीबाणीला विरोध करताना, " अध्यक्षीय भाषणात या आणीबाणीच्या विरोध त्या जाहीरपणे करतील अशी भीती आणि आशादेखील लोकांना वाटत होती. कारण , आधीपासूनच बाईंनी आणीबाणीचा उल्लेख न करता लेखकपत्रकारांवरच्या सेंसारशिप वर टीका करायला सुरुवात केलेलीच होती...... सरकारनेच तुरुंगात टाकलेल्या जयप्रकाश नारायण यांच्यासारख्या ज्येष्ठ नेत्याच्या प्रकृतीला आराम पडावा, यासाठी प्रार्थना करण्यासाठी, दोन मिनिटे सर्वांनी उभे राहण्याचे आवाहन केले . तेव्हा एकजात सगळे उभे राहिले."[५] या प्रकारे त्यांनी आणीबाणीला विरोध केला.

'लहानी' हे दुर्गा भागवत यांचे पुस्तक १९८० मध्ये प्रसिद्ध झाले. या पुस्तकात त्यांच्या लहानपणाच्या आठवणी सांगितले आहेत. यात एकूण १७ लेख आहेत . पहिल्या लेखात त्यांच्या आजोळच्या आठवणी सांगितल्या आहेत. त्या लहान असतानाचे प्रसंग वर्णन केले आहेत . दुर्गा भागवत यांना लहानपणी सर्कशीत काम करण्याची आवड होती असे सांगितले आहे. त्यासाठी त्यांनी वेगवेगळे प्रयोग देखील केले होते. त्यासाठी कशी कसरत करत याचे वर्णन 'सर्कसवाली' यात आले आहे. या पुस्तकातून दुर्गा भागवत यांचे अवखळ असे बालपण वाचकांच्या समोर येते. अशा प्रकारे दुर्गा भागवत यांनी आपल्या ललित लेखातून विविध विषयांवर समृद्ध लेखन केले आहे . त्यांनी सर्व सामान्य वाटणाऱ्या घटनेवर परिणाम कारक लेखन करून ललित साहित्यात मोलाची भर घातली आहे हे लक्षात येते.

संदर्भ ग्रंथ

१) एलकुंचवार महेश, 'दुर्गाबाई', दैनिक तरुण भारत, नागपूर, ३० नोव्हेंबर १९७५
२)कोठावळे अशोक, संपा. मासिक 'ललित', दुर्गा भागवत विशेषांक अंक ८ वा ऑगस्ट २००२, पृ. क्र. २९
३)भागवत दुर्गा, 'पैसा', मौज प्रकाशन गृह, मुंबई, दुसरी आवृत्ती १९७३, पृ. क्र.२०
४)भागवत दुर्गा, 'ऋतुचक्र', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, चौथी आवृत्ती, १९७३ पृ. क्र. ३
५ )ढेरे अरुणा, संपा. 'दुर्गा भागवत: व्यक्ती, विचार आणि कार्य", पद्मगंधा प्रकाशन, पुणे, मार्च २०११ पृ. क्र. ४८

UGC CARE Group - I Journal
ISSN : 0975-4520

KALA SAROVAR

# Kala Sarovar

## CERTIFICATE OF PUBLICATION

*This is to certify the paper Entitled*

दुर्गा भागवत यांचे ललित गद्य लेखन

*Authored By*

डॉ किशोर पाठक
सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग प्रमुख, पंकज कला व विज्ञान महाविद्यालय,चोपडा

*Published in*

Vol-25 No.01(I) January-March 2022
Kala Sarovar
ISSN : 0975-4520
UGC Care Group 1 Journal
Impact Factor: 2.132

Editor
Kala Sarovar

Scanned with OKEN Scanner

# राजेश जोशी के काव्य में सामाजिकता

प्रा. दिलीप पंडित पाटील
पंकज कला एवं विज्ञान महाविद्यालय, चोपड़ा
जिला-जलगांव
(Email : deelip.patil115@gmail.com)

मनुष्य और साहित्य का अटूट रिश्ता है। मनुष्य जीवन में परिवर्तन की आस जगाने का कार्य साहित्य करता है। साहित्य समाज के लिए दिशादर्शक होता है। सामाजिक स्थिति एवं गति का अंकन साहित्य में समयानुसार होता आया है। लोगों में सामाजिक बोध जागृत करने का कार्य साहित्य ही करता है। मनुष्य के आंतरिक विकास का पथ प्रदर्शन साहित्य से ही संभव हो पाता है। साहित्य चाहे कहानी हो या कविता उसमें यथार्थ बोध हो।साहित्य जन का पक्षधर होना चाहिए। लेखक अपने समय और समाज को साहित्य के माध्यम से अभिव्यक्त करता है। इसके अलावा साहित्य मनुष्य-मनुष्य को जानने-समझने के लिए सहायता करता है।मानवीय रिश्तों को मजबूत करता है। इसमें संदेह नहीं की,वही साहित्य सामाजिक चेतना का मूल स्रोत होता है। साहित्य और समाज के बारे में डॉ.लाजपतराय गुप्त लिखते हैं कि,साहित्य और समाज एक दूसरे के पूरक हैं। जहां एक ओर साहित्य में सामाजिक भावों और विचारों की प्रतिछाया परिलक्षित होती है।वहां समाज भी साहित्य द्वारा प्रसारित भावों से स्पष्टत:प्रभावित होता है।साहित्यकार अपने समाज के मुख और मस्तिष्क दोनों होते हैं ।उसी के द्वारा हम समाज के हृदय तक पहुंचते हैं और उन परिस्थितियों का पता लगाने में समर्थ होते हैं। जो समाज को प्रभावित कर उसमें एक नयी लहर उत्पन्न करती है। वस्तुत:साहित्य समाज का मात्र प्रतिबिंब ही नहीं अपितु नियामक और उन्नायक भी है।[1]

साहित्य मानव उत्थान के लिए मददगार साबित होता आया है। कोई भी रचनाकार के लिए रचना लिखना इतना ही काम न होकर बल्कि उसके पीछे रचना के माध्यम से लोकजीवन एवं लोकतत्व से सीधा संबंध जोड़ना होता है । आधुनिक युग बाजारीकरण का युग है।बाजार की दृष्टि से ही सबको देखा जाता है। बाजार व्यक्ति,वस्तु,व्यवहार में लिप्त है। इसलिए मानव जीवन में रिश्तों की अहमियत कम होती जा रही है। संवेदनशील मनुष्य असंवेदनशील होता नजर आ रहा है तथा मानवीय मूल्यों में गिरावट स्पष्ट है।तभी रचनाकार के आगे बाजार का दृश्य खड़ा हो जाता है और वह मनुष्य की सामाजिक दशा और दिशा को व्यक्त करता है।

हिंदी साहित्य में समकालीन साहित्यकारों में राजेश जोशी सशक्त और सफल रचनाकार के रूप में सामने आते हैं।उनका काव्य सामाजिक यथार्थ का दस्तावेज है। सामाजिक बोध को चित्रित करने में राजेश जोशी अग्रगण्य हैं। समय और समाज की मांग उनका काव्य है।उनका काव्य समाज को एक नई दिशा एवं सोच देता है। मनुष्य जीवन की पहचान सही अर्थों में करवाता हैं।साथ ही मानव जीवन के खोते मूल्यों को तलाशता है।समाज की खोखली व्यवस्था को दर्शाता है।आज का समय बाजारीकरण, भूमंडलीकरण, अवसरवादी तथा उपयोगितावादी युग का है।जिसमें मानव जीवन के तत्वों का हनन हो रहा है।चाहे वह प्रेम, सद्भाव, सत्य, अपनत्व, समानता, रिश्तें-नाते,समाज तथा परिवारों हो।

कवि राजेश जोशी समकालीन समाज को रेखांकित करते हैं। उनकी कविता में आशा-आकांक्षा,अकेलापन,उदासी,विचारों की टकराहट,परिवेश की सजगता,रिश्तों-नातों में बिखराव,गरीबी, असमानता, निराशा,तनाव,घुटन आंतरिक द्वंद्व,बेचैनी,आसक्ति तथा ग्रसित सोच आदि का चित्रण मिलता है।उनके काव्य की सबसे बड़ी विशेषता यह है कि,वह आम जनता की पहचान करवाता हैं। अत:पारिवारिक समस्या, भ्रष्टाचार, बेरोजगारी, बाल मजदूरी जैसी सामाजिक समस्याओं को भी रुपायित करता हैं। राजेश जोशी ने

तत्कालीन समय की परिस्थितियों को काव्य में चित्रित किया है।साथ ही, मानवीय तत्वों को अभिव्यक्त किया है।कवि मानव जाति को बचाना चाहता है। उनकी मथोड़ी सी जगहफ्ककविता मानव कल्याण की कामना से ओतप्रोत हैं । राजेश जी आम आदमी के सुख-दुख के साथ जुड़े हुए कवि हैं । आम आदमी के लिए राजेश जोशी में बेचैनी स्पष्ट रुप से देखने को मिलती है। वर्तमान सामाजिक व्यवस्था के प्रति उनका मन कलुषित है। वे कहते हैं...

बहुत थोड़ी-सी जगह चाहिए उन्हें पृथ्वी पर
थोड़ी-सी जगह,जिसमें अपने को
जैसे-तैसे समेटकर बैठ जाए
जिसमें पाँवों को मोड़कर सो सके[२]

कवि मानव को बचाने की बात करते हैं। मानवीय जीवन सुचारु रुप से चलें तो वह जीवन है। अन्यथा मनुष्य घर,परिवार तथा समाज से कट जाता है। बेरोजगारी भारतीय समाज खोखला कर रही है।वह समकालीन जीवन की प्रदीर्घ समस्या है। बेरोजगारी किसी एक व्यक्ति की समस्या न होकर वह पूरे भारतीय समाज की समस्या है। जैसे ही परिवार बढ़ता है।वैसे ही यह समस्या का जन्म होता है।आज की शिक्षा व्यवस्था की वजह से उच्च शिक्षित को भी नौकरी नहीं मिल पाती।व्यवस्था की कमजोरी शिक्षितों को बेरोजगारी की तरफ धकेलती है। इसलिए भारतीय युवाओं को निराशा का सामना करना पड़ता है। वे टूट जाते हैं। परिणामतःखुदकुशी करने के लिए मजबूर हो जाते हैं।

आज शासन व्यवस्था के खिलाफ जगह-जगह आंदोलन हो रहे हैं।वे आंदोलन में खासकर युवा नजर आते हैं। बेरोजगार युवक नौकरी की तलाश में दर-दर की ठोकरें खाते हुए हम देख रहे हैं।इसी को देख कर कवि का मन उदास हो जाता है मवे तीनफ्ककविता के माध्यम से कहते हैं कि.

तीसरे दिन भर सड़के नापता
नौकरी की अर्जियां लिखता
ऑफिसों के चक्कर लगाता
दिखता एकदम फक्कड़
पर अंदर ही अंदर
उदास रहता है[३]

आज भारतीय जन-मानस के सम्मुख बेरोजगारी की समस्या का प्रश्न खडा है। कई जगह पर हम देखते हैं कि,बच्चों को काम पर लगाया जा रहा है। जो युवा नहीं कर सकते वे काम आज बच्चे कर रहे हैं। वह भी कम मजदूरी में।इसलिए बच्चों के प्रति कवि यहां मुक्ति की कामना करते नजर आते हैं। पारिवारिक परिस्थितियों के कारण तथा माता-पिता की सोच के कारण बच्चे काम पर जा रहे हैं।कवि राजेश जोशी का'नेपथ्य में हँसी 'काव्य संकलन की कविता'बच्चे काम पर जा रहे है' इसकी साक्ष प्रस्तुत करती है....

कोहरे से ढकी सड़क पर बच्चे
काम पर जा रहे हैं
सुबह-सुबह
बच्चे काम पर जा रहे हैं
हमारे समय की सबसे भयानक पंक्ति है यह[४]

बाल मजदूरी की यह समस्या आज भी कायम है।बच्चों के प्रति होने वाले अन्याय और अत्याचार को व्यक्त करते हुए भारतीय शिक्षित समाज को जागृत करने कार्य कवि यहाँ करते दिखाई देते हैं।कवि समाज में फैली विसंगति तथा अन्याय के विरोध में आवाज लगाने की हिम्मत देते हैं।अन्याय से लड़ने के लिए वे लिखते हैं.....

हजारों मील दूर
एक चिड़िया
पिंजरे के खिलाफ
हवा के लिए लड़ रही है[५]

असल जीवन की व्याख्या संघर्ष ही तय करता है।मनुष्य का जीवन संघर्ष से व्याप्त है।सामाजिक समस्याओं को उखाड़ ने में यही कारगर सिद्ध होता है।आलोच्य कवि सामाजिक संवेदनाओं को पूरी शिद्दत के साथ चित्रित करते हैं।आम जनता के लिए उनकी वेदना तरल होती नजर आती हैं। कवि का रचना संसार समाज के स्वरूप को सशक्त ढंग से उद्घाटित करता है। उनका समूचा काव्य समाज का पक्षधर है तथा परिवेश के प्रति सजग हैं। इसलिए वह सूझबूझ के साथ लोकजीवन को व्याख्यायित करते नजर आते हैं।

राजेश जोशी आधुनिक दूषित सामाजिक परिवेश को अपनी कविताओं के माध्यम से चित्रित करते हैं।आज परिवार टूट कर बिखर रहे हैं। मनुष्य के विचार परिवर्तित हो गए हैं।संयुक्त परिवार एकल परिवार में बदल रहे हैं। समाज व्यवस्था में बदलाव आ गया

समकालीन जीवन की यह त्रासद स्थिति में पारिवारिक प्रेम,वात्सल्य एवं आत्मीयता सूख गई है। स्वार्थता की जड़े मजबूत हो गई है।अपने-अपनों की ही उपेक्षा करते नजर आ रहे हैं । परिवार के सदस्यों में आस्था नहीं दिखाई देती है। रिश्तो-नातो में सिर्फ व्यावहारिकता नजर आती हैं। 'संयुक्त परिवार'कविता में घटित घटना को कवि बड़े ही अर्थ विस्तार के साथ समझाते हैं.....

मेरे आने से पहले ही कोई लौटकर चला गया है
घर के ताले में उसकी पर्ची खुसी है
टूटने के क्रम में टूट चुका है बहुत कुछ,बहुत कुछ
अब इस घर में रहते हैं ईन मीन तीन जन[5]

गांव से शहर की ओर भागता मनुष्य न तो पूरा गांव का होता है न हीं शहर का, फिर भी उसकी समज शहरी हो जाती हैं।इसी शहरीकरण की धुंधी में वह धन को तलाशते नजर आता है। परिणामतःवह टुकड़ों-टुकड़ों में विभाजित हो जाता है।वह एक समय था संयुक्त परिवार हुआ करते थे अपनत्व की भावना जगती थी।लेकिन समय की गति ने संयुक्त परिवार को एकल परिवार में रूपांतरित कर दिया।आधुनिक समज रखने वाले लोग ताला जड़कर कहां चले जाते हैं इसका पता नहीं लगता।इसलिए मनुष्य में तनाव,घुटन तथा उदासीनता घर कर रही है

आज भी देश में कई जगहों पर लोगों को भुखे पेट सोना पड़ता है। जैसे-तैसे एक वक्त की रोटी की जुगाड़ का इंतजाम होता है। मजदूरी करेंगे तो ही रोटी नसीब होगी अन्यथा व्रत ही रखना पड़ेगा।कई हिस्सों में लकड़ी बेचकर आजीविका का साधन जुटानेवाले लोगों के बारे में 'थोड़ी सी जगह' कविता में कवि कहते हैं की....

सिर पर लकड़ी का गट्ठर लिये
वे दौड़ रहे हैं,प्लेटफार्म पर
किसी बोगी के दरवाजे में अपना गट्ठर चढ़ा
किसी भी कोने में सिकुड़ कर बैठ जायेंगे वे[6].....

ऐसे लोगों को लोग हिकारत की दृष्टि से देखते हैं। उनके लिए थोड़ी जगह छोड़ना दूर उनका बैठना भी उनको अखरता है। वे भूल जाते हैं कि पेट की आग बुझाने के लिए दिन भर पसीना बहाकर लकड़ी लाने वाले लोग भी समाज का ही हिस्सा है।

राजेश जोशी जनवादी कवि हैं । उनका समूचा काव्य जनचेतना से जुड़ा हुआ है। उनकी निरीक्षण क्षमता बेजोड़ हैं। साथ ही,परिवेश के प्रति उनकी सजगता काफी सराहनीय है। जीवन के स्वाद को लेकर उनकी 'जन्म' कविता जन्म लेती है। बंजारों का दैनिक जीवन जैसे टेंट लगाना,खाना बनाना,एक जगह से दूसरी जगह जाना,घूमना-फिरना,चीजों को संजोकर रखना। इन सभी को कवि बडे ही संवेदनीक धरातलपर चित्रित करते हैं। बंजारों के मानसिक क्रिया-कलापों को पकड़ते हुए लिखते हैं....

कितना अनमोल कितना अद्वितीय होती है
वे साधारण चीजें
पुराने अखबार का वो कोई छोटा सा टुकड़ा
जिसमें बांध कर रखा जाता है नमक

इतने सहेज कर रखती हैं वह बंजारन औरत नमक को कागज में बांध लिया हो जैसे उसने पूरा अरब सागर[8]

बंजारों के जीवन में नमक जैसी छोटी सी चीज भी कितना महत्व रखती है।जो भोजन एवं जीवन के तत्वों को समझाती हैं।बंजारों की सामाजिक स्थिति एवं दैनिक गति का चित्र यहां कवि व्यक्त करते हैं।

राजेश जोशी की कविता समकालीन सामाजिक समस्याओं को उद्घाटित करती है।उनकी कविता भ्रष्टाचार,बाल मजदूरी, अन्याय, अत्याचार, पारिवारिक समस्या,मूल्य विघटन,गरीबी,शहरीकरण तथा आधुनिक बोध का परिचय करवाती है।कवि सामाजिक दायित्वबोध के प्रति अत्यंत सजग हैं। वे लोगों में चेतना का स्वर भरकर जागृति लाना चाहते हैं। उनका काव्य अत्यंत संवेदनशील होने से लोकचेतना का संवाहक बन पडा है। राजेश जी अपने काव्य संसार के माध्यम से सामाजिक व्यवस्था में बदलाव की अपेक्षा व्यक्त करते हैं। समकालीन विसंगत परिवेश,वास्तविक जीवन का यथार्थ तथा सामाजिक समस्याओं को उन्होंने प्राथमिकता दी है।अपने काव्य को नई दिशा दे कर सामाजिक चिंतन की भाव-भूमि प्रदान करते हैं।

**संदर्भ ग्रंथ -**

१.डॉ.लाजपतराय गुप्त -'बीसवीं शताब्दी के हिंदी नाटकों का समाजशास्त्रीय अध्ययन'-प्राक्कथन से
२.राजेश जोशी - 'नेपथ्य में हँसी' पृ.२१
३.राजेश जोशी - 'धुपघड़ी' पृ.१४३
४.राजेश जोशी - 'नेपथ्य में हँसी' पृ.२३
५.राजेश जोशी - 'एक दिन बोलेंगे पेड़' पृ.२२
६.राजेश जोशी - 'दो पंक्तियों के बीच' पृ.५४
७.राजेश जोशी - 'नेपथ्य में हँसी' पृ.२१
८.राजेश जोशी - 'नेपथ्य में हँसी' पृ.०९

Kala Sarovar
(UGC Care Group-1 Journal)
ISSN: 0975-4520
Vol-25 No.01(I) January-March 2022

# दहशतवाद व भारताची राष्ट्रीय सुरक्षा

**दिपकराव बाबुराव देवरे**
संशोधक विद्यार्थी, संरक्षण व सामरिक शास्त्र विभाग, पंकज कला व विज्ञान महाविद्यालय, चोपडा, ता. शिंदखेडा जि. धुळे

**प्रा. डॉ. एस. पी. ढाके**
संशोधन मार्गदर्शक, प्रमुख संरक्षण व सामरिक शास्त्र विभाग, कला व वाणिज्य महाविद्यालय, नरडाणा, ता. चोपडा जि. जळगाव

## प्रस्तावना:-

दहशतवाद ही जगभरातील समस्या आहे. जगात असा एकही भाग नाही जिथे दहशतवादी कारवाया एका किंवा दुसऱ्या विचारधारेखाली होत नाहीत. 21व्या शतकात, विकसित आणि विकसनशील अशा जवळपास सर्वच राष्ट्रांसाठी दहशतवादाचा धोका हा सुरक्षेचा प्रमुख मुद्दा बनला आहे. दहशतवाद हा एक वादग्रस्त मुद्दा आहे, ज्याने केवळ देशांच्या प्रादेशिक ऐक्य आणि राजकीय स्थिरतेलाच आव्हान दिलेले नाही, तर जागतिक शांतता आणि प्रादेशिक सुरक्षेच्या दृष्टीने त्याचे दूरगामी परिणाम होऊ शकतात. दहशतवाद एखाद्या समूहाद्वारे किंवा राष्ट्र-राज्याद्वारे आयोजित केला जातो हे योग्यरित्या समजून घेण्यासाठी, त्याच्या काही वैशिष्ट्यांचे विश्लेषण करणे आवश्यक आहे, कारण एखाद्या गटाद्वारे प्रेरित दहशतवाद नियंत्रित केला जाऊ शकतो, परंतु एखाद्या राज्याद्वारे प्रोत्साहन दिलेला दहशतवाद नियंत्रित करणे कठीण आहे.1

दहशतवाद हा राजकीय हिंसाचाराचा एक विशेष प्रकार आहे. या अंतर्गत हिंसक शक्तीने भीतीचे वातावरण निर्माण करून सतत दबाव कायम ठेवत आपले मुद्दे मिळवण्याची प्रवृत्ती आहे. यामध्ये तोडफोड, हत्या, बॉम्बचा वापर करून जनतेच्या मनात भीती निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो, जेणेकरून ते निषेध करू शकत नाहीत आणि या कृतींविरोधात आवाज उठवू शकत नाहीत. दबावाचे वातावरण निर्माण करण्यासाठी हिंसाचाराची कृत्ये पुन्हा पुन्हा केली जातात.

दहशतवादी प्रवृत्ती आणि पद्धती केवळ सत्तेबाहेरील व्यक्ती आणि गटच वापरत नाहीत, कधी कधी या प्रवृत्तींचा वापर सत्ताधारी पक्ष आपले सार्वभौमत्व टिकवण्यासाठी हिटलर, मुसोलिनी, स्टॅलिन, रशियन यांसारखे करतात. आपली सत्ता टिकवण्यासाठी दहशतवादाचा वापर करून जनमानसात दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो. 2

## अर्थ, व्याख्या व संकल्पना:-

विविध अभ्यासक, लेखक आणि आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये दहशतवादाची व्याख्या अनेक प्रकारे केली गेली आहे, परंतु आजपर्यंत त्याची सार्वत्रिक व्याख्या निश्चित झालेली नाही. दहशतवाद म्हणजे बहुसंख्य लोकांना घाबरवण्यासाठी मर्यादित लोकांविरुद्ध हिंसाचाराचा वापर किंवा धमकी. सनत्झू या प्राचीन चिनी तत्त्ववेत्त्याच्या मते, एक खून हजारो लोकांना घाबरवतो.3 दहशतवाद म्हणजे सामान्यतः राजकीय उद्दिष्टे साध्य करण्यासाठी हिंसेचा पद्धतशीर आणि नियोजनबद्ध वापर.

दहशत, दहशतवाद आणि दहशतवादी हे शब्द विचारधारा म्हणून नवीन नाहीत, जे सध्याच्या काळातील विचारवंतांच्या संवेदनांना धक्का देतात. दहशतवाद हा शब्द इंग्रजी टेररिझम या शब्दाचे मराठी रूपांतर आहे. टेरीरिजम हा इंग्रजी शब्द मूळ टेरीओस्टे या फ्रेंच शब्दापासून घेण्यात आलेला आहे. हिंसक मार्गाने आपले उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी



Scanned with OKEN Scanner

ISSN: 0975-4520
Vol-25 No.01(I) January-March 2022

किंवा आपले ध्येय साध्य करण्यासाठी व्यक्ती संस्था किंवा गट यांचा वापर करतात. इंग्रजी विश्वकोश यामध्ये दहशतवादाचा अर्थ लोकांना मारण्याची संघटित व्यवस्था म्हणजे दहशतवाद अशी व्याख्या केलेली आहे. त्याचप्रमाणे टेरर म्हणजेच दहशत हा शब्द डेटर या लॅटिन शब्दापासून आला असावा. थरकाप उडविणे किंवा घाबरवणे हा दहशतवादाचा अर्थ म्हणता येईल. 3

" राजकीय सामाजिक किंवा धार्मिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी हिंसा किंवा दिवशीच्या घटकांचा उपयोग म्हणजेच दहशतवाद होय अशी व्याख्या संयुक्त राष्ट्र संघाने 1937 मध्ये केलेले आहे. "4

बेंजामिन नेतान्याहू यांच्या मतानुसार, "आपली राजकीय उद्दिष्टे साधण्यासाठी निष्पाप लोकांची जाणीवपूर्वक व पद्धतशीरपणे केलेली हत्या तसेच त्यांना जखमी करून त्यांच्या अवयवांची केलेली निघृण मोडतोड आणि त्या माध्यमातून निर्माण केलेले भीतीचे वातावरण म्हणजेच दहशतवाद होय" अशी व्याख्या त्यांनी केली आहे.

डॉ शांतीश्री पंडित यांच्या मतानुसार, राजकीय कारणाने प्रेरित झालेला व भय निर्माण करण्यासाठी निष्पाप लोकांना तसेच प्रशासनाला लक्ष करणारा हिंसाचार म्हणजेच दहशतवाद होय.

बोआझ गनर यांनी, "राजकीय उद्दिष्टे साध्य करण्यासाठी नागरी लक्ष अथवा सामान्य नागरिक यांच्या विरोधात शिवसेनेचा प्रत्यक्ष वापर करणे किंवा तशा प्रकारे धमकी देणे या कृतीला दहशतवाद" असे म्हटलेले आहे.

दहशतवाद हा एक दिशाहीन स्वरूपाचा विनाश नसतो, दहशतवादा मागे काही निश्चित उद्देश असतात, प्रेरणा देणारी विचार प्रणाली असते, कार्य साधणाऱ्या संघटना असतात, अटळ निष्ठा बांधीलकी ठेवणारे व्यक्ती असतात, आर्थिक बळ असते आणि ध्येय साध्य करण्याची असीमित जिद्द असते. अशा या दहशतवादाची आज संपूर्ण जगभर चर्चाही होताना दिसून येते. भारतातील दहशतवादाच्या संदर्भात भारतात क्रांतिकारी दहशतवाद नक्षलवादी दहशतवाद, वांशिक दहशतवाद, धार्मिक कट्टरवादी दहशतवाद, फुटीरतावादी दहशतवाद, प्रशासकीय दहशतवाद, गटवादी दहशतवाद अशा विविध प्रकारच्या दहशतवादाचा समावेश होतो. या सर्व प्रकारच्या कारवाईमुळे भारताची राष्ट्रीय सुरक्षितता मोठ्या प्रमाणावर धोक्यात येताना दिसून येते. त्याचप्रमाणे या दहशतवादी हल्ल्यामुळे भारताच्या एकूणच राष्ट्रीय विकास कार्य पुढे अनेक प्रकारचे अडथळे निर्माण झाले आहेत, त्यामुळे या दहशतवादाची सर्व स्तरावर ती पाळेमुळे नष्ट करण्याची वेळ आता आलेली आहे. या सर्व बाबींचा अभ्यास सदर शोध निबंधात करण्यात आलेले आहे.5

**भारतातील काही प्रमुख दहशतवादी घटना-**

13 डिसेंबर 2001 रोजी पाच अतिरेक्यांनी भारतीय संसदेवर सकाळी 11:40 वाजता हल्ला केला. हा हल्ला करणारे जैश-ए- मोहम्मद या संघटनेचे सभासद होते. लष्करी गणवेश घातलेले व कारमध्ये बसून त्यांनी सुरक्षा सैनिकांना खुणेची सर्व चिन्हे शब्दप्रयोग दाखवीत त्यांनी पार्लमेंटच्या व्हीआयपी प्रवेशद्वारापाशी येऊन प्रवेश मिळवला. त्यांनी आत मध्ये प्रवेश करून हॅन्डग्रेनेडसचा मारा सुरक्षा सैनिकांवर करायला सुरुवात केली सोबतच एके-47 रायफलतून गोळ्यांचा वर्षाव सुरू केला.

24 सप्टेंबर 2002 रोजी गुजरात मधील स्वामीनारायण पंथाच्या अक्षरधाम मंदिरावर दोन अतिरेक्यांनी काही हॅन्डग्रेनेडस व एके-47 रायफल घेऊन मंदिरावर फेकले व रायफल मधुन गोळ्या झाडल्या. त्यामुळे सर्वत्र गोंधळ व पळापळ सुरू झाली या घटनेत 35 व्यक्ती मृत्यू तर 50 जण जखमी झाले.

18 ऑक्टोबर 2005 रोजी जम्मू-काश्मीरचे शिक्षण मंत्री गुलाब नबीलोन यांच्यावर दहशतवाद्यांनी हल्ला केला. त्यात त्यांचे दोन सुरक्षारक्षक व एक नागरिक ठार झालेत या हल्ल्याची जबाबदारी अल मन्सूरने घेतली होती.

20 ऑक्टोबर 2005 रोजी पाकिस्तानच्या दहशतवादी गटाने एकामागून एक केलेल्या बॉम्बस्फोटाने राजधानी दिल्ली हादरली. या दहशतवादी हल्ल्यात एकूण 63 माणसे मारली गेली व 100 पेक्षा जास्त जखमी झाली. हा



Scanned with OKEN Scanner

ISSN: 0975-4520
Vol-25 No.01(I) January-March 2022

दहशतवादी हल्ला सरकारी संस्थांवर, इमारतींवर किंवा मंदिरांवर नव्हता, कोणत्याही प्रकारच्या सरकारी मंत्र्याच्या बंगल्यावर नव्हता तर सर्वसामान्य नागरिकांच्या पार अंतर्भागात होता.

29 ऑक्टोबर 2005 रोजी दिल्ली येथे काही स्थानांवर दहशतवादी हल्ल्या झाला होता त्यामध्ये 70 लोक ठार झाले होते.

7 मार्च 2006 रोजी वाराणसी येथे साखळी बॉम्बस्फोट घडविण्यात आले. ते बॉम्बस्फोट संकटमोचन मंदिर तसेच बनारस हिंदू विद्यापीठाच्या परिसरात झाले. या दहशतवादी हल्ल्यात बांगलादेशीय हरकत-अल- जिहादी- इस्लाम या संघटनेद्वारे केल्याचे वृत्त होते.

महाराष्ट्राची राजधानी असणारे मुंबई शहर हे दाट लोकवस्तीचे व जास्त लोकसंख्येचे शहर आहे. तसेच भारताची आर्थिक राजधानीचे शहर व मनोरंजनाचेही प्रमुख केंद्र आहे. अशा या शहरात व्यवसाय, नोकरीच्या माध्यमातून रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध असल्याने देशाच्या विविध भागातून मोठ्या प्रमाणात लोक या ठिकाणी रोजगारासाठी येतात. त्या संधीचा फायदा घेऊन मुंबई शहरात विविध दहशतवादी गटांनी या ठिकाणी दहशतवादी कारवाया केल्या दिसून येतात. त्यामध्ये ठळक दहशतवादी हल्ले खालील प्रमाणे-

**मुंबईतील लोकल रेल्वेत झालेले बॉम्बस्फोट:-**

11 जुलै 2006 रोजी मुंबईतील पश्चिम रेल्वेच्या डब्यांमध्ये सात बॉम्बस्पोट दहशतवाद्यांनी घडवून आणले. या हल्ल्यात 190 लोक मृत्युमुखी पडले त र 817 लोक गंभीर जखमी झाले. या दहशतवादी हल्ल्यानंतर पश्चिम रेल्वेची वाहतूक बंद करण्यात आली होती. या घटनेवरूनच तेथील परिस्थितीचे वास्तव लक्षात येते. या बॉम्बस्फोटातील खटल्याच्या आरोपींना 30 सप्टेंबर 2015 रोजी विशेष मोक्का न्यायालयाने मरेपर्यंत फाशीची शिक्षा तर अन्य आरोपींना जन्मठेपेची शिक्षा सुनावली.

26 नोव्हेंबर 2008 रोजी दहा पाकिस्तानी दहशतवाद्यांनी मुंबई शहरात भीषण हल्ला केला तो 28 नोव्हेंबर पर्यंत चालला. या हल्ल्यात 34 विदेशी नागरिकांसह 197 लोक मरण पावले. तर 800 हून अधिक लोक या हल्ल्यात गंभीर जखमी झाले. मुंबईतील अशा या महाभयंकर दहशतवादी हल्ल्यात नऊ दहशतवाद्यांना ठार केले व एकाला जिवंत मुंबई पोलिसांनी पकडले.

13 फेब्रुवारी 2010 रोजी पुण्याच्या जर्मन बेकरीत बॉम्ब स्पोट इंडियन मुजाहिद्दीन या दहशतवादी संघटनेने घडवून आणला त्यात 17 नागरिक ठार तर 59 नागरिक जखमी झालेत.

10 एप्रिल 2010 रोजी चिन्नास्वामी स्टेडियम बेंगलोर येथे झालेल्या बॉम्बस्फोटात अकरा नागरिक ठार झालेत.

7 ऑक्टोबर 2010 रोजी दिल्लीच्या जामा मशीद बाहेर कार बॉम्ब स्पोट घडून आणला गेला या स्फोटात पंधरा नागरिक ठार होऊन 56 व्यक्ती जबर जखमी झालेत. 6

**मालेगाव बॉम्बस्फोट :-**

08 सप्टेंबर 2006 रोजी नाशिक जिल्ह्यातील मालेगाव या ठिकाणी शब-ए-बरतशब-ए-बरतच्या पवित्र ठिंकाणी शुक्रवारच्या दिवशी मशिदी मध्ये प्रार्थना झाल्यानंतर बाजूच्या बडा कब्रस्थानात स्फोट होऊन 37 जन मृत्युमुखी तर 125 लोक गंभीर जखमी झाले होते. शहरांमध्ये तात्काळ संचारबंदी लागू करून निमलष्करी दलांना तैनात करण्यात आले होते. महाराष्ट्र दहशतवादविरोधी पथकाने सुरुवातीला स्टुडेंट इस्लामिक मूव्हमेंट ऑफ इंडिया ( सिमी) या संघटनेला दोषी ठरवले. परंतु म्हणतात 2013 मध्ये दाखल करण्यात आलेल्या आरोपपत्रानुसार अभिनव भारत या संघटनेवर दोषारोप ठेवण्यात आला. मुख्य आरोपी म्हणून कर्नल पुरोहित व साध्वी प्रज्ञासिंग यांना अटक करण्यात आली होती. परंतु पुरेसे पुरावे नसल्याच्या कारणावरून कर्नल पुरोहित व साध्वी प्रज्ञासिंग सहा आरोपींवरील



Scanned with OKEN Scanner

मोक्का हटवण्यात आला. व त्यानंतर दोघांनाही जामीन मंजूर झाला.

**समारोप-**

जगात आज दहशतवादी हल्ल्यात बळी पडणाऱ्या राष्ट्रांमध्ये भारताचा क्रमांक सर्वात वरचा आहे. भारताशी मोकळ्या मैदानात युद्धात विजय मिळवणे अशक्य आहे, हे ओळखुननच पाकिस्तानने भारताविरुद्ध छुपे युद्ध सुरू केले आहे. भारत अंतर्गत समस्यांमध्ये गुरफटल्यास भारत दुबळा होईल व काश्मीर हस्तगत करणे सहज सोपे जाईल असा भारतात दहशतवाद पसरवण्यातमागे पाकिस्तानचा उद्देश होता आजही आहे. परंतु आजही कश्मीरसह भारतात त्यांनी प्रायोजित दहशतवाद सुरू ठेवलेला आहे. सर्व भारतीय नागरिकांनी दहशतवाद विरुद्ध लढण्याची मानसिकता ठेवली, एकीने या समस्यांशी लढा दिला तर देशातील एकात्मता व सदभावना निश्चितच वाढीस लागून एक संघटित या हिंसाचाराचा सामना जर प्रत्येक भारतीयाने केला तर या दहशतवादाचा भारतातून नि:पात करणे फार कठीण नाही. त्यासाठी सर्व भारतीयांनी सर्वप्रथम आम्ही भारतीय आहोत ही भावना बाळगण्याची गरज आहे.

**संदर्भ ग्रंथ :-**

1. डॉ. सिंह सुरेंद्र, डॉ. ममता चौधरी - आतंकवाद, क्षेत्रवाद एवं राष्ट्रीय एकीकरण, पॉईंट पब्लिशर्स जयपूर-2010
2. कुलवंत कौर- ग्लोबल टेररिझम,इशूज, डायमेन्शन्स अंड ऑप्शन्स, नई दिल्ली - कनिष्क 2005
3. तोडकर बी. डी.- भारताचे राष्ट्रीय सुरक्षितता, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव- 2016
4. उदगावकर म. न. 21 व्या शतकातील दहशतवाद डायमंड पब्लिकेशन, पुणे- 2013
5. WWW Tarunbharat. Com
6. चौधरी ए.पी.सौ.चौधरी अर्चना- नक्षलवाद आणि दहशतवाद, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव 2019

Scanned with OKEN Scanner

Kala Sarovar
(UGC Care Group-1 Journal)
ISSN: 0975-4520
Vol-25 No.01(I) January-March 2022

# "आदिवासी भिल्ल जमातीतील स्त्री: ऐतिहासिक पार्श्वभूमी व सामाजिक, आर्थिक जीवन

**प्रा.शामसिंग रामसिंग बळवी**
संशोधक विद्यार्थी, पंकज कला व विज्ञान महाविद्यालय, चोपडा जि. जळगांव

**प्रा. डॉ. सुनील अ. पाटील**
मार्गदर्शक, उत्तमराव कला व विज्ञान महाविद्यालय, दहीवेल ता.साक्री जि. धुळे.

**प्रस्तावना:-(Introduction)**

आदिवासी हा एक प्राचीन व मूळनिवासी समुदाय आहे. आदिवासी हा जगातील बहुसंख्य देशात आढळणारा समाज आहे. जगात अमेरिका, आफ्रिका ऑस्ट्रेलिया व आशिया खंडात बहुसंख्य लोकसंख्येने आदिवासी जमाती आढळून येतात. आधुनिक जगापासून दूर व अलिप्त असलेला परंतु त्यांच्या सामाजिक व सांस्कृतिक बाबी संदर्भात पुढारलेला म्हणता येईल. सृष्टीची दादा तादात्म्य व एकरूपता आदिवासी समुदायात दिसून येते. भारत हा बहूविविध धर्म, पंथ, जाती, वंश व भाषिक असणारा देश आहे. या देशात अनेक आदिवासी जमाती राहतात. आदिवासीत समाजात विविधत जमाती आढळतात.त्यांच्यात सामाजिक सांस्कृतिक व धार्मिक बाबतीत वैविध्यपूर्णता असली तरी अनेक गोष्टीत त्यांच्यात समानता दिसून येते. आदिवासीच्या सामाजिक,आर्थिक, राजकीय, धार्मिक व सांस्कृतिक गोष्टीवर नैसर्गिक घटकांचा प्रभाव मोठ्या प्रमाणात दिसून येतो.२१ व्या शतकातील आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञानाचा प्रभाव त्यांच्या जीवनावर दिसून येतो. आजही त्यांच्या रूढी, परंपरा, प्रथा लोकांचार, लोकनिती, मूल्ये व प्रमाणके त्यांच्या काही निसर्गदत्त सवयी, दैनंदिन जगण्याचा व्यवहार यावर नैसर्गिकरित्या अवलंबून असल्याचे आजही आढळून येते. बहुसंख्य आदिवासी डोंगर, दऱ्याखोऱ्यात, जंगलात, नदीच्या खोऱ्यात व पाण्याने वेढलेल्या बेटाच्या भूभागात राहतात.भारत स्वतंत्र झाल्यानंतर विकासाच्या विविध योजना आदिवासी क्षेत्रात राबवल्या गेल्या.त्याच्या काही परिणाम आदिवासी भागात बदल झालेले आढळून येतात. बदलत्या विकासाच्या प्रक्रिये- बरोबर आदिवासी समाजाला बदल घडवून आणणे अलीकडे गरजेचे दिसून येत आहे.

**आदिवासीची ऐतिहासिक पार्श्वभूमी:-**

जगात पिग्मी, एस्किमो, बुशमन यासारख्या जमाती आढळतात. भारतात सुद्धा आदिवासी समुदायाच्या विविध जमाती आहेत. त्यात प्रामुख्याने गोंड, संथाल, आंध, कातकरी, ओराव, कोरकू, कोकणा, कोलाम, ठाकर, परधान, मल्हार कोळी, हलबा, पारधी इत्यादी अनेक जमाती आहेत. भारतात ४१४ पेक्षा अधिक आदिवासी जमाती राहत आहे.

भारतात राजस्थान, गुजरात, मध्य प्रदेश व महाराष्ट्र राज्यात भिल्ल जमाती मोठ्या संख्येने राहतात. महाराष्ट्रातील अरवली पर्वतापासून तर खानदेशाच्या पश्चिमेस सातपुडा पर्वत रांगांच्या मधून गुजरातच्या समुद्रापर्यंत या विस्तीर्ण प्रदेशात भिल्ल जमातीचे वास्तव्य आहे.

भिल्ल जमातीच्या इतिहास हा त्यांच्या दंतकथा, आख्यायिका, शिलालेख,महाकाव्य इत्यादी साधनातून प्रकट होतो. भारतावर अनेक परकीय आक्रमणे झाली,आर्य, मोगल, ब्रिटिश, फ्रान्स, पोर्तुगीज या सारख्या परकीय आक्रमणास सह एतद्देशीय राजे, सरदार व सेनापतीनी आक्रमण केलेत व त्यात काळानुरूप बदल होत गेला परंतु आदिवासी



Scanned with OKEN Scanner

समाजाने त्यांची सामाजिक व सांस्कृतिक जीवन प्रणाली व त्याचा सांस्कृतिक वारसा मौखिक स्वरूपात टिकवून ठेविला. आदिवासींनी आपली निसर्गदत्त उपजत संस्कृतीचा मौखिक इतिहास आजही जतन करून ठेवलेला आहे.

भारतात वेद, पुराणे,रामायण महाभारत,स्मृती वाङ:मय सारख्या प्राचीन ग्रंथात आहेत. रामायण सारख्या प्रसिद्ध ग्रंथामध्ये भिल्लांच्या उल्लेख आढळून येतो. रामायण या ग्रंथामध्ये जेव्हा रामाला १४ वर्षाच्या वनवास होतो. तेव्हा त्यांच्या वनवासात त्यांना दंडकारण्यात 'शबरी' नावाची भिल्ल वृद्ध स्त्रीने रामाला बोरे खायला दिले व तिने दंडकारण्यात त्यांचे स्वागत केल्याचे सुद्धा उल्लेख या काव्यामधून दिसून येते. अर्थात दक्षिण भारतात राजपुत्र रामाच्या प्रवेशापूर्वी या ठिकाणी आदिवासी भिल्लांची वस्ती असल्याचे रामायण वरून आढळते. हा भूप्रदेश भिल्लांच्या उदरनिर्वाह दृष्टीने महत्त्वाचा असावा. हा भूभाग फळाफुलांनी व्यापलेला भूप्रदेश असावा असे वरील गोष्टीवरून दिसून येते. त्याचप्रमाणे महाभारत या महाकाव्यात 'एकलव्य' या आदिवासी भिल्ल तरुण धनुर्विद्येत पारंगत मिळवण्याचा हेतूने द्रोणाचार्यांना गुरु मानून द्रोणाचाऱ्याकडे शिष्य होण्याची धाडस करतो व विद्यार्जन करण्यासाठी प्रचंड इच्छाशक्ती, प्रमाणिकपणा, अपार कष्ट व शिकण्याचं जिद्द व सातत्य राखून धनुर्विद्येत प्राविण्य मिळवतो व द्रोणाचार्यांना गुरु पद बहाल करतो, त्यापोटी गुरुदक्षिणा म्हणून उजव्या हाताच्या अंगठा द्रोणाचार्यांनी मागितला म्हणून त्याने समर्पण वृत्तीने आपल्या गुरूला अर्पण करतो. यावरील कथेवरून महाभारतातील आदिवासी भिल्ल जमातीची या भारत भूमीवर यापूर्वीच वास्तव्य होते. हे या काव्यातून स्पष्ट होते. 'भिल्ल आदिवासीचा स्वातंत्र्यलढा'

भारतात ४१४ पेक्षा अधिक आदिवासी जमातीचे वास्तव्य आहेत. जगात सर्व देशात कमी-अधिक प्रमाणात आदिवासी राहतात. अमेरिका, आफ्रिका ऑस्ट्रेलिया व आशिया सारख्या खंडात बहुसंख्येने आदिवासी जमाती आढळून येतात. आदिवासी समाजाला विविध नावाने संबोधले जाते. इंग्रजीमध्ये आदिवासींना 'Tribes' या शब्दाने ओळखले जाते.त्याचा अर्थबोध 'जमाती'असा होतो तर प्रसिद्ध मानववंशशास्त्रज्ञ व समाजशास्त्रज्ञ आदिवासींना Aboriginals अथवा Aboriginals असेही म्हटले जाते.त्याचा अर्थ मूळनिवासी, मूळ रहिवासी, प्राचीन अथवा आदिवासी असा शब्दप्रयोग होतो असे ग्रीगसन, डॉ.व्हेरियल इलावीन,रिसले आणि .ए व्ही. ठक्कर सारख्या अभ्यासकांनी केलेला दिसतो.तर आदिम अथवा आदिवासीना (Primitive Tribes)असे हंटन केलेले आहे. तसेच डॉ.गोविंद सदाशिव घुर्ये सारख्या विद्वानांनी (So called Aborigines)व मूळ निवासी अथवा त्यांना (Backward Hindus) मागासलेले हिंदू असा केलेला दिसतो. आदिवासी जंगलात,घनदाट अरण्यात राहतात म्हणून त्यांना 'वनवासी' असेही म्हटले जाते.तर डोंगर, दऱ्याखोऱ्यात व पर्वतात राहतात म्हणून 'गिरिजन'असा शब्दप्रयोग सुद्धा आदिवासीसाठी केला आहे . भारतीय राज्यघटनेत त्यांना Tribe किंवा Tribal यार्थाने त्यांना संबोधले जाते.Tribe या शब्दाचा अर्थ 'जमात'अथवा जो टोळी किंवा समुह, गट करून राहतो व 'अनुसूचित जमाती' (Scheduled Tribes) या अर्थाने ओळखला जातो. भारतात हिंदी भाषेत 'जनजाति' तर मराठी भाषेत 'आदिवासी' हा शब्द रूढ असलेला दिसून येतो.

आदिवासी समाज ही सज्ञा स्पष्ट होण्यासाठी विविध मानववंशशास्त्रज्ञ व समाजशास्त्रज्ञांनी व्याख्या पुढील प्रमाणे स्पष्ट केलेल्या आहे.

१) ई.बी.टायलर यांच्या मते "विशिष्ट भूभागात सामाजिक समूह करून राहणारा,एक समान संस्कृती बोलीभाषा असणाऱ्या साधारणतः एकजिनसी व एकात्मता असणारा सामाजिक संघटन असणारा एकच पूर्वज मानणारा एकसमान देवता असलेल्या समान नेतृत्वाला मानणारा तसेच सर्व सामाजिक समूहातील कुटुंबाचे सामाजिक, धार्मिक



Scanned with OKEN Scanner

Kala Sarovar
(UGC Care Group-1 Journal)
ISSN: 0975-4520
Vol-25 No.01(I) January-March 2022

,आर्थिक व परस्परांची रक्त संबंधित संबंधांनी जोडलेला समूह म्हणजे आदिवासी होय"[1]

२) डी. एन. मजुमदार यांच्या मतानुसार "एकसमान नाव धारण करणारा विशिष्ट अशा भूभागावर कायम वस्ती करून राहणारा लग्न,व्यवसाय संदर्भात सारख्या स्वरूपात निषेध नियमांचे अमल करणारा, सारख्या बोलीभाषेचा उपयोग व एकमेकांची जबाबदारी निश्चित करण्याच्या हेतूने एक क्रमवार व्यवस्था आत्मसात करणारा कुटुंबाचा अथवा परिवार गटांचे एकत्र झालेल्या समूहाला आदिवासी असे म्हणतात"[2]

३) शिलाँग येथे १९६२साली आदिवासी समितीची परिषद भरली होती. त्या परिषदेने आदिवासींची व्याख्या केलेली आहे. या परिषेदे नुसार "आदिवासी हा एक समान भाषा बोलणारा एका पूर्वजांपासून उत्पत्ती सांगणारा एका विशिष्ट भूप्रदेशात वास्तव्य करणारा तांत्रिक ज्ञानाच्या दृष्टीने मागासलेला अक्षर ओळख नसलेला व रक्त संबंधावर आधारित सामाजिक व राजकीय प्रथांचे प्रामाणिकपणे पालन करणारा एतद्देशीय एकजिनसी समूह होय"[3]

४.ब्रिटिशांच्या राजवटीत प्रसिद्ध केलेल्या इंपिरिअल गॅझेटियर ऑफ इंडिया, या ग्रंथानुसार "समान नाव धारण करणारा, समान बोली भाषा बोलणारा, एकाच भू-भागावर राहणारा,आणि पूर्वी जरी अंतर्विवाही असण्याची शक्यता असली तरी आता अंतर्विवाह नसलेल्या कुटुंबाचा समुच्चय म्हणजे आदिवासी समाज होईल"[4]

वरील विविध विचारवंतांनी व तज्ञाने मांडलेल्या व्याख्येतून काही ठळक बाबी समोर येतात त्या पुढील प्रमाणे विशिष्ट भूभागावर राहणारा, रक्त संबंधित गट, एकात्मता व सामाजिक संघटन असलेला, सांस्कृतिक एकात्मता असलेला, एकच पूर्वजांपासून उत्पत्ती मानणारा,एक सारख्या बोलीभाषा देवी - देवता व पूजाविधीत सारखेपणा आढळणारा वाङ:मय साहित्याचा उपयोग करणारा समुदायाला आदिवासी समाजात समावेश होतो. उपरोक्त

आदिवासी भिल्ल स्त्रियांचा सामाजिक व आर्थिक जीवनावर नैसर्गिक घटकाचा प्रभाव दिसून येतो. आदिवासी भिल्ल जमातीत स्त्री-पुरुष समानता दिसून येते. आदिवासी भिल्ल जमातीत पुरुषांप्रमाणेच आर्थिक क्रियांमध्ये सामान स्वरूपात सहभाग आढळून येतो. भिल्ल स्त्रियांमध्ये परंपरा व प्रथेनुसार कामाची विभागणी झालेली आढळते. घरातील स्वयंपाक, जंगलातील कंदमुळे ,लाकूड- फाटा फळे गोळा करणे, भरतकाम, शिवणकाम या सारखी घरातील साधे व सोपे काम स्त्रिया करतात.तर जे श्रमाचे काम पुरुष करताना दिसून येतात.आदिवासी भिल्ल जमातीत स्त्री-पुरुष समानता दिसते.आदिवासी भिल्ल जमातीत स्त्रियांचे सामाजिक स्थान व तिची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण असते.प्रत्येक समाजात स्त्रियांचं स्थान त्याची जागा निश्चित झालेले असते ते वय,वंश,धर्म,लिंग,जाती,आर्थिक,शिक्षण, व्यवसाय, विवाह इत्यादी आधाराने समाजातील स्थान निश्चित होते. त्याचप्रमाणे आदिवासी भिल्ल जमातीत समाजातील स्थान ठरत असते

आदिवासी भिल्ल जमातीत काही सामाजिक बाबी खूप महत्त्वाच्या असतात. त्यांच्या जीवन व्यवहारात त्या ठळक स्वरूपात दिसून येतात.आदिवासी भिल्ल स्त्रियांमध्ये चालीरीती, परंपरा, प्रथा ,सण-उत्सव आणि वेशभूषा, केशभूषा ,खाण्यापिण्याच्या सवयी व कला यासारख्या बाबी खूप विशेष असतात. आदिवासी भिल्ल समाजातील स्त्रियांचा दर्जा अतिशय महत्वाचा आहे. स्त्री- पुरुष विषमता दिसत नाही. सांस्कृतिक मूल्य व्यवस्था टिकवण्यात व जतन करण्यात स्त्रीयांचे योगदान मोठे आहे. आदिवासी भिल्ल स्त्री ही कुटुंबाचा आधार असते हे तिच्या कार्यावरून ठळकपणे दिसून येते.पुरुषाला खांदा लावून काम करताना दिसून येते. तिला समाजात पूर्ण स्वातंत्र्य दिलेले दिसून येते.ही सांस्कृतिक मूल्यांची परंपरा मौखिक स्वरूपात एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित करण्याची प्रक्रिया निरंतर चालू आहेत.

आपल्या कुटुंबाच्या संगोपन, संवर्धन पालन-पोषण व उदरनिर्वाह कार्यात आदिवासी भिल्ल स्त्रीयाकडे फार



Scanned with OKEN Scanner

ISSN: 0975-4520
Vol-25 No.01(I) January-March 2022

मोठा भार दिसून येतो.संघर्षमय जीवनाचा प्रारंभ जन्मताच प्राप्त होतो. जंगलातून कंदमुळे गोळा करणे, फळे-फुले ,लाकडाच्या मोळ्या विकणे, मोल-मजुरी करणे,शेतात राबणे, मध,डिंक गोळा करणे ई.सारख्या क्रियेत तिची भूमिका महत्त्वाची ठरते. समाजाच्या सामाजिक व आर्थिक प्रक्रियेतील जबाबदारी लीलया पेलण्याची निसर्गदत्त शक्ती आदिवासी भिल्ल स्त्रियांमध्ये दिसून येते.

निष्कर्ष:- जगात अनेक देशात आदिवासी समाज राहत आहेत. अमेरिका, ऑस्ट्रेलिया,आफ्रिका व आशिया खंडातील बहुसंख्य देशामध्ये आदिवासी समाज वास्तव्य करून राहत आहे. त्याच प्रमाणे भारतात सुद्धा विविध राज्यात कमी-अधिक प्रमाणात आदिवासी समाज राहत आहे.आदिवासी हा प्राचीन मूळनिवासी समाज म्हणून ओळखला जातो. मानववंशशास्त्रज्ञ व समाजशास्त्रज्ञांनी आदिवासींना 'मूळ निवासी' 'आदिम' 'नावाने म्हणून संबोधले आहेत.भारतात विविध धार्मिक ग्रंथांमध्ये आदिवासींचा उल्लेख दिसून येतो. रामायण महाभारत .पुराणे व वेद यासारख्या ग्रंथात विविध नावाने संबोधले गेले आहेत. रामायण मध्ये 'शबरी' नावाच्या भिल्ल स्त्रीने १४वर्षाच्या वनवासात असताना बोरे खायला दिल्याचे उल्लेख या काव्यातून दिसून येतो.त्याच प्रमाणे महाभारतात सुद्धा द्रोणाचार्यांना गुरु म्हणून विद्यार्जन करण्यासाठी अपार मेहनत, जिद्द, चिकाटी व प्रमाणिकपणातून धनुर्विद्येत प्राविण्य मिळवतो.त्या एकलव्याचा उल्लेख सुद्धा काव्यातून दिसून येतो. भारतीय राज्यघटनेत आदिवासी 'अनुसूचित जमाती, म्हणून उल्लेख केलेला आहेत. भारतात आदिवासी भिल्ल स्त्रियांमध्ये सामाजिक व आर्थिक प्रक्रियेत नैसर्गिक घटकांचा प्रभाव दिसून येतो. आदिवासी भिल्ल स्त्रियांमध्ये सामाजिक,आर्थिक प्रक्रियेत मोलाचे योगदान आहे. आदिवासी भिल्ल जमातीच्या मौखिक इतिहास टिकवण्यामध्ये स्त्रियांचे योगदान मोठे दिसून येते. समाज व्यवस्थेतील स्त्रीची भूमिका व तिचे कार्य अतिशय महत्त्वपूर्ण आहे. आदिवासी भिल्ल समाजातील स्त्रियांमध्ये स्त्री-पुरुष समानता दिसून येते. कुटुंबाचा महत्वाचा कणा म्हणून स्त्रीकडे आजही पाहिले जाते.

**संदर्भ ग्रंथ:-**

१. मनोहर दीनानाथ - "भिल्ल आदिवासीचा स्वातंत्र्यलढा" जनार्थ आदिवासी विकास संस्था, शहादा जिल्हा नंदुरबार, प्रकाशन.पृ. क्र.०९ ते २०

२.देवगावकर शैलजा देवगावकर- श. गो. - "आदिवासी विश्व " आनंद प्रकाशन,नागपूर प्रथमावृत्ती जुलै २००१.पृ.क्र.०१ ते ०२

३. आकरे बी. एन.- "आदिवासींची ओळख" प्रकाशक अशोक पिंपळापुरे बुक डिस्ट्रीब्युटर्स, नागपुर प्रथमावृत्ती एप्रिल २०१४. (३)पृ.क्र. ०३

४.नाडगोंडे गुरुनाथ - "भारतीय आदिवासी" ऋतुपर्ण अनिरुद्ध कुलकर्णी कॉन्टिनेन्टल प्रकाशन विजयनगर पुणे४११०३०. चौथी आवृत्ती २०१२ (४) पृ.क्र. ०३

५. गायकवाड दिपक - "आदिवासी चळवळ स्वरूप व दिशा"प्रकाशक व मुद्रक सुगावा प्रकाशन ५६२, सदाशिव पेठ, पुणे प्रथमावृत्ती १५ ऑगस्ट २००५.

६. देवगावकर एस. जी. - "आदिवासी विकास प्रशासन" ललित पुराणिक श्री साईनाथ प्रकाशन, १ भगवाघर कॉम्प्लेक्स धरमपेठ ,नागपूर ,प्रथमावृत्ती २३ फेब्रुवारी २०११.

६.आगलावे प्रदीप -"आदिवासी समाजाचे समाजशास्त्र" ललित पुराणिक श्री साईनाथ प्रकाशन,धरमपेठ ,नागपूर चौथी



Scanned with OKEN Scanner

ISSN: 0975-4520
Vol-25 No.01(I) January-March 2022

आवृत्ती फेब्रुवारी २०११.(६)पृ.क्र. १७५ ते १८५.



Scanned with OKEN Scanner

Journal
of the
Oriental Institute
M.S. University of Baroda
ISSN: 0030-5324

# IMPACT WATER POLLUTION ON HEALTH IN INDIA

**Dr. Nandini Pandurang Wagh** Assistant professor HOD, Department of Geography Pankaj Arts and Science College Chopda, Dist. Jalgaon

**ABSTRACT :-** Water pollution is OnePlus of the biggest issues facing India right now. Safe drinking water is a basic need for all humans. The WHO reports that 80% diseases are water borne. Industrialization, discharge of domestic waste, radioactive waste, population growth, excessive use of pesticides, fertilizers and leakage from water tanks are major sources of water pollution. These wastes have negative effect on human health. Different chemicals have different affects depending on their location and kinds. Bacterial, viral and parasitic diseases like typhoid, cholera, encephalitis, poliomyelitis, hepatitis, skin infection and gastrointestinal are spreading through pollution water. It is recommended to examine the water quality on regular basis to avoid it's destructive effect on human health. Domestic and agricultural waste should not be disposed of without treating.
**Keywords:-** Sources of water pollution, Chemicals in drinking water, Harmful chemical, Infectious diseases.

**Introduction:-**

Water is an important natural resource used for drinking and other developmental process in our lives. Safe drinking water is necessary for human health all over the world.Being universal solvent, water is major source of infection. According to the world health organisation (WHO) 80% diseases are water borne. Drinking water in various countries does not meet WHO standard 3.1 % deaths occurs due to the unhygienic and poor quality of water. It is a well known fact that clean water is absolutely essential for healthy living. Adequate supply of fresh and clean drinking water is a basic need for all human beings on the earth, yet it has been observed that millions of people worldwide are deprived of this.

Discharge of domestic and industrial effluent wastes, leakage from water tanks, marine dumping, radioactive waste and atmospheric depositing are major causes of water pollution. Human health is affected by the direct damage of plants and animal nutrition. Water pollutants are killing sea weeds, mollusks, marine birds, fresh, crustaceans and other organisms that serve at food for human. Insecticides like DDT concentration is increasing along the food chain. These insecticides are harmful for humans.

**Major sources of water pollution:-**

1. Domestic sewage
2. Industrialization
3. Urbanization
4. Population growth
5. Pesticides and fertilizers
6. Weak Management system
7. Plastics and polythene bags.

It is reported that 75 to 80% water pollution is caused by the domestic sewage. Waste from industries like, sugar, textile, electroplating. Pesticides, pulp and paper are polluting of water. Polluted river have intolerable small and contains less flora and fauna 80% the world's population is facing to water security.



Scanned with OKEN Scanner

**Causes of water pollution in India:-**

Uncontrolled urbanization in these areas has also led to generation of sewage water. In the urban areas water is used of both industrial and domestic purposes from waterbodies such as rivers, lakes, streams, wells and pounds. Worst still, 80% of the water that you used for our domestic purpose is passed out in the form of westwater. In most of the causes, this water is not treated properly and as such it leads to tremendous pollution of surface- level freshwater.

Following are some other important reasons of increasing levels of water pollution in India:-

1. Global warming
2. Ddentification
3. Industrial waste
4. Oil leaks from ships
5. Acid rain
6. Reducing in water quantity in rivers in plains
7. Inadequate industrial treatment of waste.

**Effect of water pollution in India:-**

Polluted water can lead to diseases such as cholera, tuberculosis, dysentery, jaundice, diarrhoea, ect In fact, around 80% stomach ailments in Indian happen because of consuming polluted water. In fact as far as India is concerned polluled water is one of the major factors behind the general low levels of health in India, especially in rural areas.

Water pollution can have some tremendously -adverse effect on the health of any and every life from living in the vicinity of the polluted water body or using water that has been polluted of some extent. At the certain level polluted water can be detrimental to crops and reduce the fertility and soil thus harming the aur all overall agriculture sector and the country as well. When sea water is polluted it can also impact oceanic life in a bad way . The most fundamental effect of water pollution is however on the quality of the water, consuming which can lead to several ailments.

**Effect of water pollution on human health :-**

There is a greater association between pollution and health problem. Nutrient pollution and harmful algal blooms create toxins and components that are dangerous for your health. There are several ways that people can be exposed to these components.

**Direct Exposure to Toxins Algae:-**

Drinking water can be a source of exposure to chemicals causes by nutrient pollution. Drinking accidentally swallowing or swimming in water affected by a harmful algae bloom can cause serious health problems including:-

1. Rashes.
2. Stomach or liver illness.
3. Respiratory problems.
4. Neurological affects.

Many waterborne infectious disease are linked with fecal pollution of water source and result in fecal- oral route of infection. Health risk associated with polluted water includes different diseases such as respiratory diseases, cancer, diarrheal diseases neurological disorder and cardiovascular diseases.

**Bacterial diseases:-**

Untreated drinking water and fecal contamination of water is the major causes of diarrhea. Campylobacter jejuni spread diarrhea 4% to 15% 15% worldwide. Fever, abdominal pain, nausea, headache are major symptoms of diarrhoea. Good hygienic practices and use of antibiotics can prevent this disease. Disease Cholera is caused by the contaminated water. Vibrio Cholerae is responsible for this disease. This bacterium produced toxins in digestive to tracks. The symptoms of this disease



Scanned with OKEN Scanner

**Causes of water pollution in India:-**

Uncontrolled urbanization in these areas has also led to generation of sewage water. In the urban areas water is used of both industrial and domestic purposes from waterbodies such as rivers, lakes, streams, wells and pounds. Worst still, 80% of the water that you used for our domestic purpose is passed out in the form of westwater. In most of the causes, this water is not treated properly and as such it leads to tremendous pollution of surface- level freshwater.

Following are some other important reasons of increasing levels of water pollution in India:-

1. Global warming
2. Ddentification
3. Industrial waste
4. Oil leaks from ships
5. Acid rain
6. Reducing in water quantity in rivers in plains
7. Inadequate industrial treatment of waste.

**Effect of water pollution in India:-**

Polluted water can lead to diseases such as cholera, tuberculosis, dysentery, jaundice, diarrhoea, ect In fact, around 80% stomach ailments in Indian happen because of consuming polluted water. In fact as far as India is concerned polluled water is one of the major factors behind the general low levels of health in India, especially in rural areas.

Water pollution can have some tremendously -adverse effect on the health of any and every life from living in the vicinity of the polluted water body or using water that has been polluted of some extent. At the certain level polluted water can be detrimental to crops and reduce the fertility and soil thus harming the aur all overall agriculture sector and the country as well. When sea water is polluted it can also impact oceanic life in a bad way . The most fundamental effect of water pollution is however on the quality of the water, consuming which can lead to several ailments.

**Effect of water pollution on human health :-**

There is a greater association between pollution and health problem. Nutrient pollution and harmful algal blooms create toxins and components that are dangerous for your health. There are several ways that people can be exposed to these components.

**Direct Exposure to Toxins Algae:-**

Drinking water can be a source of exposure to chemicals causes by nutrient pollution. Drinking accidentally swallowing or swimming in water affected by a harmful algae bloom can cause serious health problems including:-

1. Rashes.
2. Stomach or liver illness.
3. Respiratory problems.
4. Neurological affects.

Many waterborne infectious disease are linked with fecal pollution of water source and result in fecal- oral route of infection. Health risk associated with polluted water includes different diseases such as respiratory diseases, cancer, diarrheal diseases neurological disorder and cardiovascular diseases.

**Bacterial diseases:-**

Untreated drinking water and fecal contamination of water is the major causes of diarrhea. Campylobacter jejuni spread diarrhea 4% to 15% 15% worldwide. Fever, abdominal pain, nausea, headache are major symptoms of diarrhoea. Good hygienic practices and use of antibiotics can prevent this disease. Disease Cholera is caused by the contaminated water. Vibrio Cholerae is responsible for this disease. This bacterium produced toxins in digestive to tracks. The symptoms of this disease



Scanned with OKEN Scanner

**Viral Disease:-**

Hepatitis is a viral disease caused by contaminated water and infects the liver.Jaundice, loss of appetite,fartigue, discomfort and high fever are symptoms of hepatitis. If it is persits for a long time it may be fatal and result in death. Vaccine is available for hepatitis and by adopting good hygienic practice; one can get rid of this disease. Most people don't show any symptoms and but some symptoms are headache,high fever, muscle stiffness, convulsions however in servere cases coma and paralysis result. No vaccine is available for this disease.

**Parasitic Diseases:-**

Cryptosporidiosis is a parasitic disease caused by the cryptosporidium parvum. It is worldwide disease and symptoms are diarrhea, loose or watery bowls, stomach cramps and upset stomach. Infection occurs when cyst found in contaminated water and it is swallowed.Symptoms are fever, chills and watery diarrhea . Sometimes it is known as travelers's disease. People suffering from giardiasis have symptoms bloating, excess gas, watery diarrhea and weight loss.

**Solution of water pollution in India:-**

It is said that leaked oil-even from cars and machine is one of the principal contributors to water pollution. Hence, it is important to look at cars and machines, which run on oil, on a regular basis, to check them for any possible oil leak.It is important after work especially in factories and production units where oil is used to clean up the wasted oil either dispose it properly or keep it later use. Following are some other ways in which this problem can be addressed adequately:-

1. Cleaning up waterways and beaches
2. Avoiding the usage of non-biodegradable material like plastic
3. Being more involved in various measures pertaining to preventing water pollution.

The best way to solve these issues is to prevent them. The first major solution in this context is conservation of soil. Soil erosion can contribute to water pollution. So, if soil can be conserved we can prevent water pollution too. We can follow measures such as planting more trees, managing erosion in a better way, and use farming methods that are better for the soil. In the same vein it is also important to follow the right methods in disposing toxins waste. For starters, we can use products that have lesser amounts of volatile organic compounds in them. Even in cases where toxic material like paints, cleaning supplies, and stain removers are used, they need to be disposed off in the right way. It is also important to look into oil leaks in one's cars and machines.

**Conclusion:-**

Water pollution is a global issue and world community is facing worst result of polluted water. Major sources of water pollution are discharge of domestic and agricultural wastes, population growth, excessive use the pesticides and fertilizers and urbanization. Bacterial, viral and parasitic disease are spreading through polluted water and affecting human health. It is recommended that there should be proper waste disposal system and waste should be treated before entering in to river. Educational and awareness programs should be organized to control the pollution.

**Reference:-**

1. Azeem Abdul :-"Causes Effect and solution of water pollution" International irrigation management institute .

2.Khurana I, Sen R.:- Drinking water quality in rural India: Issues and approaches -Water Aid. India water Portal. 2008.

3. Krishnan S, Indu R Groundwater contamination in India: Discussing physical processes, health and sociobehavioral diamensions. Water Policy Research Programmes, Anand ,India 2006.

4. Halder JN, Islam MN.:- Water pollution and its impact on the human health. Journal of environment and human .2015



Scanned with OKEN Scanner

 ISSN: 0974-3065

# मुंबईतील ब्रिटिश कालीन कामगार क्षेत्रातील स्त्रियांची स्थिती

**प्रा. दिलीप भिमराव गिऱ्हे**
इतिहास विभाग
पंकज कला व विज्ञान महाविद्यालय चोपडा
जिल्हा जळगाव

---

भारतात प्राचीन काळापासून स्त्री हा घटक नेहमीच उपेक्षित राहिलेला दिसून येतो. काही कालखंडात स्त्रियांची स्थिती चांगली रेखाटल्या गेली मात्र एकूण स्त्रियांच्या गुणोत्तराचे प्रमाण पाहिले की ते नगण्य होते. भारतीय इतिहास लेखनात स्त्रियांचा इतिहास लिहित असताना वास्तव परिस्थितीचे वर्णन कमी प्रमाणात असल्याचे स्पष्ट होते. तशीच काहीशी स्थिती ब्रिटिशकालीन मुंबईतील कामगार क्षेत्रातील स्त्रियांची होती. मुंबई प्रांतात ब्रिटिश राजवटीत औद्योगिक क्रांतीमुळे उद्योग क्षेत्रात झपाट्याने विकास झाल्याचे दिसून येतो. या औद्योगिकरणामुळे महाराष्ट्र आर्थिक दृष्ट्या पुढारलेले राज्य बनले होते. मात्र या स्पर्धेमुळे कामगार वर्गाची स्थिती अत्यंत वाईट झाली होती. त्यात विशेष करून महिला कामगारांची स्थिती अत्यंत बिकट होती. या परिस्थितीमुळे अनेक स्त्रियांना आपले आयुष्य गमवावे लागले होते. ब्रिटिश राजवटीत मुंबई प्रांतात मजुरांच्या श्रमाचा प्रश्न महत्त्वाचा असताना देखील त्याकडे कधीच लक्ष केंद्रित केले गेल्याचे दिसून येत नाही. यामागील महत्त्वाचे कारण म्हणजे भांडवलदारांची मजूराप्रति अनास्था, भांडवलदार वर्गाला आपली आर्थिक भरभराट महत्त्वाची वाटत होती. कामगारांच्या श्रमाचे दुख त्यांना महत्त्वाचे वाटत नव्हते म्हणून मुंबईतील ब्रिटिशकालीन कामगार क्षेत्रातील स्त्रियांची स्थिती अत्यंत हालाखीची व बिकट होती.

"मुंबईतील गिरणी मध्ये काम करणाऱ्या दीनदलित स्त्रिया कामगारांवर दिवसाढवळ्या जे अत्याचार होत होते त्याचे शोषण होत होते आणि अहोरात्र काम करून घेऊन त्यांचे रक्त शोषले जात होते" [१] म्हणजे उद्योग क्षेत्रात अधिकाधिक नफा कमावण्यासाठी स्त्रीयांना यंत्राप्रमाणे समजल्या जात होते ज्याप्रमाणे अहोरात्र एखादे यंत्र मशीन काम करते. त्याला आरामाची गरज नसते त्याप्रमाणे मुंबई क्षेत्रात स्त्रियांना कामाला जुंपले जात असल्याचे भयावह चित्र होते स्त्रिया कडून क्रुरपणे अहोरात्र काम करून घेतल्या जात होते त्यांचे रक्ताचे शोषण मोठ्या प्रमाणात



Scanned with OKEN Scanner

ISSN: 0974-3065

होत असल्याचे दिसते मात्र एवढे होत असताना भांडवलदार वर्ग या स्त्रियांकडे कधीच सहानुभूती दाखवताना दिसत नाही. "गिरण्यातील स्त्रियांना सर्वाधिक कष्ट काढावे लागत होते घरात आणि गिरणीत त्यांना रात्रंदिवस राहावे लागत होते"[२] औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या स्त्रियांना घर सांभाळून गिरणीत काबाडकष्ट करावे लागत होते. मुंबईच्या छोट्याशा चाळीत आपला संसार उभा करून त्याचा गाडा चालवण्याचे अत्यंतिक कष्टाचे काम स्त्री कामगार करताना दिसून येते एवढ्यावर त्याचे कष्ट थांबल्याचे दिसत नाही तर गिरणी सकाळपासून सायंकाळी सूर्यप्रकाश असे पर्यंत काम करावे लागत होते दुपारी जेवणाच्या वेळी स्त्रियांना साफसफाई करणे छोटी छोटी कामे करणे हे स्त्रियांच्या वाट्याला नेहमीच परवणी असल्याचे स्पष्ट होते. म्हणजे कामगार स्त्रिया ह्या एखाद्या निर्जीव यंत्रासारखे सतत काबाडकष्ट करणारे यंत्र मशीन होते.

"स्त्रिया आणि मुले यांच्या शोषणाबद्दल मिल हॅन्ड असोसिएशनने अधिक प्रयत्न केलेले आढळतात"[३]. रेसकोर्सच्या ऐतीहासिक सभेचे आयोजन १८९० मध्ये करण्यात आले होते. "कामगारांच्या सभेत प्रत्यक्ष स्त्री कामगारांनी जाहीरपणे आपल्या दुःखाच्या व्यथा मांडल्या, त्याच्यावर होणारे अन्याय त्यांनी जाहीरपणे बोलून दाखवले. त्याप्रमाणे या पुरूषप्रधान देशातील शोषीत कामगार स्त्री जाहीरपणे बोलली" [४]. हे शक्य झाले फक्त सत्यशोधक विचार प्रवाहामुळे स्त्री कामगारांना लढण्याचे आत्मबळ निर्माण झाले होते. "मुंबईतल्या गिरणी कामगारांमध्ये स्त्रियांचे प्रमाण मोठे होते"[५]. महाराष्ट्रात नैसर्गिक दुष्काळ पडल्यामुळे ग्रामीण भागातील स्त्रिया काम करण्यासाठी शहराकडे मोठ्या प्रमाणात आल्याचे दिसून येते त्यामुळे कमी पैशांमध्ये मुबलक मजूर स्त्री रूपात मिळू लागला अशा परिस्थितीमुळेच औद्योगिक क्षेत्रात स्त्री कामगारांचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून येते. स्त्री कामगारांवर वेळोवेळी अडचणीची परिस्थिती असल्याचे दिसते. "स्त्री कामगारांच्या बाबतीत घरगुती कामे आईच्या जबाबदाऱ्या व इतर काही नैसर्गिक अडचणीमुळे गैरहजेरीचे प्रमाण जास्त असते"[६]. महाराष्ट्रात दुष्काळजन्य परिस्थितीमुळे ग्रामीण भागातून कुटुंबाच्या कुटुंब काम करण्यासाठी औद्योगिक क्षेत्राकडे आले होते त्यावेळी घरातील वृद्ध व्यक्ती सोबत होते अशा परिस्थितीत स्त्रियांना त्यांची जबाबदारी सांभाळावी लागत होती मात्र ही जबाबदारी सांभाळत असताना स्त्रियांना कारखान्यात कामावर जाण्यास वेळ होत होता. अशा परिस्थितीत सदर स्त्रिया गैरहजर राहत होत्या. अशा परिस्थितीत या कामगार स्त्रियांवर घरी राहण्याची वेळ येत होती तर कधी कधी त्यांना वेगवेगळ्या अत्याचाराला सामोरे जावे लागत होते त्यात त्यांचे मानसिक आर्थिक व शारीरिक शोषणही मोठ्या प्रमाणात होत होते. औद्योगिक क्षेत्रात काम करताना स्त्री कामगारांना अशा अनेक समस्यांचा सामना



Scanned with OKEN Scanner

ISSN: 0974-3065

वेळोवेळी करावा लागत होता. स्त्रियांना घरामध्ये लहान मुले वृद्ध व्यक्ती (सासु-सासरे आई-वडील) इत्यादींची जबाबदारी व्यवस्थित सांभाळावी लागत होती. अनेक वेळा त्यांच्या आजारपणाची जबाबदारी घरातील महिला वर्गावर असत होती एवढे काम करून महिला कामगार म्हणून कंपन्यांमध्ये व्यवस्थित काम करत होत्या या परिस्थितीचा सामना करत असताना महिलावर्गाची कुचंबना मोठ्या प्रमाणात होताना दिसते यामुळे कंपनीत वेळेवर पोचण्याची समस्या अनेक वेळा उद्भवत असे वेळेवर न पोहोचल्यामुळे सुपरवायझर मंडळी स्त्री कामगारांना कोणत्याही भाषेत बोलत होते मात्र या परिस्थितीचे वाईट न मानता आपला अपमान सहन करुन स्त्री कामगार काम करत होते या धावपळीमुळे स्त्री कामगारांच्या आरोग्यावर अत्यंत वाईट परिणाम होत होते. "मुंबई कापड गिरण्यात काम करणाऱ्या स्त्रिया व मुले यांची स्थिती अमानुष होती "[७]. मुंबईतील औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या स्त्रियांची आरोग्यविषयक स्थिती अत्यंत दयनीय होती. त्यांना वेळेवर जेवण मिळत नव्हते अवेळी जेवण मिळत असल्याने त्यांच्या आरोग्यावर वाईट परिणाम होत होते तसेच त्यांना पोषक असे खाद्य मिळत नसल्याने व अधिकचे कष्ट या परिस्थितीमुळे त्यांच्या आरोग्यावर अत्यंत गंभीर दुष्परिणाम होत होते. राहण्याचे ठिकाण, प्रवास करण्याचे ठिकाण व काम करण्याच्या ठिकाणी दूषित वातावरणात राहावे लागत होते म्हणून त्यांच्या आरोग्यावर अतिशय वाईट दुष्परिणाम झाले होते. या वातावरणामुळे अनेक स्त्रियांना गुडघ्याचे आजार, पाठीच्या मणक्याचे आजार, श्वास श्वास घेण्याचे आजार, फुफ्फुसाचे चे आजार, डोळ्याचे आजार, इत्यादी आजाराने ग्रासले होते. औद्योगिक क्षेत्रातील महिला कामगारांची अत्यंत दयनीय अवस्था असतानाही भांडवलदार व गिरणी मालक या कामगार स्त्रियांच्या आरोग्याची काळजी घेताना दिसत नाही.

मीनाक्षीबाई या कामगार स्त्रीने अनेक कामगार संपामध्ये सहभाग घेतला होता 1934 मध्ये एका संपाच्या वेळी संपकरी मंडळींना प्रोत्साहित करण्याचे काम ह्या करत होत्या. "मीनाक्षी बाई ने संपकरी कामगारांना अधिक जोमाने संप सुरू ठेवण्याचे आणि आजारी मालकांना संप मागे घेण्यास भाग पाडण्याचे आवाहन केले "[८]. स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी संप करणे महत्त्वाचे आहे गिरणी मालकांची एजंट व सुपरवायझर यांची हुकूमशाही प्रवृत्ती म्हणून पडायची असल्यास कामगारांनी एकत्र येणे महत्वाचे आहे यासाठी संप हा एकमेव उपाय असल्याचे त्यांनी नमूद केले होते या त्यांच्या हाकेला अनेक संपकरी कामगारांनी पाठिंबा दिला व संपात सहभाग घेतला. "संकटावर संप हा एकमेव उपाय असल्याचे तिने निर्दशनास आणून दिले "[९]. यावरून स्पष्ट होते की संपाचे महत्त्व काय असेल तसेच भांडवलदार प्रवृत्ती कामगारांवर किती मोठ्या प्रमाणात अन्याय-अत्याचार करत

ISSN: 0974-3065

असतील. गिरणीत काम करणाऱ्या स्त्रियांचे वर्णन करताना त्या सांगतात की "गिरी जीवन हे तुरुंगातील जीवनापेक्षा वाईट जीवन आहे "[१०]. ब्रिटिश कालीन तुरुंगातील जीवन गिरणीत कामगार करणाऱ्यां जीवनापेक्षा चांगले आहे म्हणजेच गिरणीत काम करणे किती अवघड असेल गिरणीत काम करणाऱ्या स्त्रियांचे जीवन वाईट होते पण यावर दुसरा काहीच उपाय नव्हता कारण की नैसर्गिक दुष्काळ मोठ्या प्रमाणात असल्याने ग्रामीण भागातील कामगार मोठ्या प्रमाणात शहराकडे आला होता अशा या दयनीय परिस्थितीत एकच उपाय तो म्हणजे गिरणीत निमूटपणे काम करणे होय. त्यामुळे स्त्रियांना या वाईट परिस्थितीत काम करावे लागत होते स्त्रियांना मानसिक शारीरिक आर्थिक आरोग्य इत्यादी प्रकारच्या छळाला सामोरे जावे लागत होते अशा अन्यायाविरुद्ध स्त्रिया संपात सहभागी होत होत्या."संपामुळे अनेक स्त्री कामगारांना आपली नोकरी गमवावी लागली अनेक वेळा उपाशी राहावे लागले प्रसंगी गोळीबाराला सामोरे जावे लागले स्त्री कामगारांनी अशा परिस्थितीत टाळायची असेल तर त्यांनी संपात सहभागी व्हावे "[११]. जेव्हा जेव्हा कामगारांनी आपल्यावर होणाऱ्या अन्यायाविरोधात संप करण्याचे ठरवले तेव्हा तेव्हा भांडवलदार वर्गानी त्यांचे मनमानी कारभार केलेला आहे. संपात सहभागी होणाऱ्या कामगारांना त्यांनी कंपनीतून काढून टाकले तसेच काही कामगारांचे दोन ते तीन महिन्याचे मासिक पगारही दिला नाही. अशा या वाईट परिस्थितीत स्त्री कामगारांची अवहेलना झाली. त्यांच्यावर उपासमारीचे संकट आले व आपली नोकरीही गमवावी लागली. अशावेळी दुसऱ्या कंपनीमध्ये काम शोधावे लागत होते कंपनीत काम करण्यासाठी महिलांची भरती संदर्भात अत्यंत वाईट परिस्थिती होती. "महिला कामगारांची भरती मुख्यता नायकिन्स किंवा मुकादमीन नावाच्या महिला प्रर्यविक्षकामार्फत केली जात असे ते खूप अत्याचारी होते आणि महिला कामगारांमध्ये त्यांची दहशत होती. त्याचे आचरण अत्यंत वाईट प्रवृत्तीचे होते "[१२]. अशा या वाईट परिस्थितीचा गैरफायदा ही मंडळी घेताना दिसते. कामगारांच्या श्रमाचे दुःख गिरणी मालक व भांडवलदार यांना महत्त्वाचे वाटत नव्हते म्हणून मुंबईतील ब्रिटिशकालीन कामगार क्षेत्रातील स्त्रियांची स्थिती अत्यंत हालाखीची व बिकट होती.

**निष्कर्ष**

१) महाराष्ट्रातील दुष्काळजन्य परिस्थितीमुळे ग्रामीण भागातून अनेक महिला औद्योगिक क्षेत्राकडे कामासाठी गेल्या होत्या.

२)महिला कामगारांची भरती मुख्यता नायकिन्स किंवा मुकादमीन यांच्या हस्ते संपन्न होत होती.

३) औद्योगिक क्षेत्रात नायकिन्स व मुकादमीन यांची दहशत होती.



Scanned with OKEN Scanner

४)नायकिन्स व मुकादमीन यांची वाईट प्रवृत्तीचे दुष्परिणाम औद्योगिक क्षेत्रातील महिलांना भोगावे लागत होते.

५) औद्योगिक क्षेत्रातील महिलांचे सामाजिक, आर्थिक, मानसिक व शारीरिक शोषण होत होते.

६) गिरणी मालक व भांडवलदार महिलांच्या आरोग्याची काळजी घेत नव्हते.

७) ब्रिटिश कालीन मुंबईतील औद्योगिक क्षेत्रातील महिला कामगारांना तुटपुंज्या पगारावर काम करावे लागत होते.

८) दूषित वातावरणामुळे महिलांना अनेक आजार जडले होते.

९) महिलांना घरातील व कंपनीतील जबाबदारी सांभाळावी लागत होती. त्यामुळे स्त्रियांना आरोग्याकडे लक्ष देणे कठीण होते.

१०) सुरुवातीला ब्रिटिश कालीन मुंबईतील औद्योगिक क्षेत्रातील महिलांचे संरक्षण करणारे कायदे नव्हते.

११) संपात सहभागी होणाऱ्या महिलांना आपली नोकरी गमवावी लागली.

१२) गिरणी मालक व भांडवलदार यांना महिला कामगारप्रती आस्था नव्हती.

१३) मुंबईतील ब्रिटिशकालीन कामगार क्षेत्रातील स्त्रियांची स्थिती अत्यंत हालाखीची व बिकट होती.

## संदर्भ


१) डॉ. मा. गो. माळी - नारायण मेघाजी लोखंडे, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई-२०१२, पृ. क्र. -१

२) मनोहर कदम - भारतीय कामगार चळवळीचे जनक नारायण मेघाजी लोखंडे- अक्षर प्रकाशन, मुंबई -२००२ पृ. क्र. -८७

३) कित्ता- पृ. क्र. -८७

४) कित्ता- पृ. क्र. -८७

५) कित्ता- पृ. क्र. -१०२

६) ना.शं. आंबर्डेकर व ज. फा. पाटील - भारतीय कामगार समस्या व कामगार विधान- कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे-१९७१ -पृ. क्र. -११

७) उपरोक्त -पृ. क्र. -१५८

८) Home Dept. File -S- 135- S B Bombay Presidency, Poona

९) कित्ता- File -S- 135




Scanned with OKEN Scanner

ISSN: 0974-3065

१०) कित्ता-File -S- 135

११)Home Dept. File -S- 15- S B Bombay Presidency, Poona

१२) Vasant Gupte - Labour Movement in Bombay, - Government of Maharashtra publication, Bombay-1981,- Page No.-29



Scanned with OKEN Scanner

ISSN: 0974-3065

# संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीत कामगार चळवळीचे योगदान

**डॉ. संजय काशिनाथ पाटील**
राज्यशास्त्र विभाग
पंकज कला व विज्ञान महाविद्यालय,
चोपडा,जि.जळगाव
sanjaykpatil79@gmail.com

**शोधनिबंधाचा गोषवारा**

संयुक्त महाराष्ट्राचा लढा हा भारताच्या स्वातंत्र्योत्तर इतिहासातील महत्त्वपूर्ण लढा होता. कामगार नेता म्हणून कॉम्रेड श्रीपाद डांगे, एस. एम. जोशी, सेनापती बापट, आचार्य अत्रे यांनी कामगार व नोकर वर्गाच्या पाठिंब्यावर संयुक्त महाराष्ट्राचे रणसिंग फुंकले होते. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी त्यांनी कामगारांना प्रेरणा दिली. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीत असंख्य अडचणी आल्या मात्र कोणत्याही परिस्थितीत न डगमगता मराठी अस्मितेचा व कामगारांच्या अस्मितेचा प्रश्न म्हणून महाराष्ट्रातील संपूर्ण कामगार एकजुटीने लढले. प्रसंगी आपल्या प्राणांचे बलिदान दिले, म्हणून कामगारांच्या दृष्टीने हा लढा ऐतिहासिक म्हटला गेला. कामगार वर्गाच्या सन्मानार्थ एक मे हा कामगार दिवस हाच महाराष्ट्र दिवस म्हणून निश्चित करण्यात आला.

**प्रस्तावना**

15 ऑगस्ट 1947 ला भारत ब्रिटिशांच्या जोखडातून मुक्त झाला. मात्र तब्बल तेरा वर्षांनी महाराष्ट्राची निर्मिती झाली. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीची 13 वर्ष निश्चितच संघर्षमय होती. स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्र राज्य निर्मितीसाठी अनेकांचे योगदान लाभले. यात शेतकरी, साहित्यिक, कामगार, बुद्धिजीवी वर्ग या सर्वांचाच महाराष्ट्राच्या निर्मितीला हातभार लागला. ह्यातूनच संयुक्त महाराष्ट्राची चळवळ उदयाला आली.

ब्रिटिशांनी भारतावर राज्य स्थापन केल्यानंतर राज्यकारभाराच्या सोयीसाठी प्रांतरचना केली होती.प्रथम बंगाल, मद्रास, मुंबई नंतर उत्तर प्रदेश, पंजाब, मध्यप्रदेश या प्रांतांची निर्मिती केली. या प्रांतरचनेत लोकांच्या भाषेचा गरजेचा किंवा त्यांच्या सोयीचा कोणताही विचार



Scanned with OKEN Scanner

 ISSN: 0974-3065

करण्यात आला नव्हता. प्रांतांचा सर्व राज्यकारभार इंग्रजी भाषेतून चालत होता. भारतीय जनतेने इंग्रजांविरुद्ध जी राष्ट्रीय स्वातंत्र्याची चळवळ उभारली.त्यात लोक भाषेचा उपयोग अधिकाधिक केला गेला. यातूनच इंग्रजांच्या प्रशासकीय राज्यकारभाराच्या प्रांतरचना ऐवजी भाषावार प्रांतरचनेची कल्पना रुजत गेली. तत्कालीन भारताचे वर्णन करताना सर जॉन सिली म्हणतात, "Its does not mark the territory of a nation and a language, but the territory of many nations and many language."[1] भारतातील अनेक भाषांचे अस्तित्व हे राष्ट्र बनण्याच्या मार्गातील अडथळा ठरतो असे सर जॉन सिली यांचा दृष्टिकोन होता.

जागतिक दृष्टिकोनातून विचार करता पहिल्या महायुद्धानंतर कामगार संघटना अस्तित्वात येत होत्या. भारतातही 1918 मध्ये आधुनिक स्वरूपाची पहिली कामगार संघटना 'मद्रास लेबर युनियन' या नावाने डॉ.अनी बेझंट यांनी काढली होती. भारतात मुंबई येथे सर्वाधिक कापडगिरण्या असल्याने 'मुंबई गिरणी कामगार संघटना' अस्तित्वात आल्या होत्या. 1920 मध्ये कामगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी 'ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस' ही व्यापक संघटना स्थापन झाली. या कामगार संघटनांचे स्वरूप कामगार कामगारांच्या न्याय्य हक्कसाठी लढण्याइतके मर्यादित होते. स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्राच्या निर्मितीच्या व परिस्थितीचा विचार करूनच कामगार चळवळी या संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी पुढे सरसावल्या. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीत कामगार चळवळीचे योगदान अभ्यासावे, या हेतूने "संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीत कामगार चळवळीचे योगदान" या शोधनिबंधाची निवड केली आहे.

**उद्देश-**

1.संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीतील महत्त्वाच्या घडामोडी अभ्यासणे.

2. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीत कामगारांचे योगदान अभ्यासणे

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी दुय्यम स्त्रोतांचा उपयोग केलेला आहे. यात संदर्भ पुस्तके, मासिके, साप्ताहिके यांचा उपयोग केलेला आहे.

**संयुक्त महाराष्ट्राची पायाभरणी**

भारतात स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच भाषावार प्रांतरचना व्यवस्थेची मागणी प्रांतातील जनतेकडून होत होती. "1917 मध्ये भाषावार प्रांतरचना हा विचार पट्टाभी सीतारामय्या यांनी मांडला होता".[2] ही पहिलीच मागणी होती. त्यामुळे ब्रिटिश सरकारने त्याकडे लक्ष दिले नाही, मात्र लोकमान्य टिळकांनी त्यांची बाजू घेतली.लोकमान्य टिळक यांच्या नेतृत्वाखाली 1919



Scanned with OKEN Scanner

मध्ये तयार झालेल्या काँग्रेस डेमोक्रॅटिक पक्षाच्या जाहीरनाम्यातील कलम दहा मध्ये भाषावार प्रांतरचनेचा समावेश करण्यात आला.

1920 मध्ये काँग्रेसने व देखील भाषावर प्रांतरचनेच्या ठराव पास केला. मराठी भाषेविषयीची अस्मिता ही स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच मराठी भाषेत जनतेमध्ये होती. तत्कालीन विचारवंतांचे विचारांचा परिणाम समाज व्यवस्थेवर झाला होता. यातूनच पुढे मराठी भाषिकांच्या सांस्कृतिक अस्तित्वासाठी भाषिक राज्याच्या मागणीची चळवळ सुरू झाली. संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा पाया स्वातंत्र्यापूर्वी घातला गेला.15 ऑक्टोबर 1938 रोजी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईला मराठी साहित्य संमेलन भरले, यात मराठी प्रदेशाच्या मागणीचा ठराव संमत करण्यात आला.या ठरावाच्या कार्यवाहीसाठी 28 जानेवारी 1940 रोजी मुंबई शहरात संयुक्त महाराष्ट्र समितीची स्थापना झाली. व "स्वतंत्र वऱ्हाडचा ठराव नागपुर असेंब्लीत मांडणारे बॅरिस्टर रामराव देशमुख हे या सभेचे अध्यक्ष झाले. 'संयुक्त महाराष्ट्र' हा शब्द केव्हापासून अस्तित्वात आला."[3] त्यामुळे या लढ्याला पुढे 'संयुक्त महाराष्ट्र' हे नाव कायम राहिले.

12 मे 1940 रोजी बेळगाव येथे साहित्य संमेलनात श्री ग.त्र.माडखोलकर अध्यक्ष होते. या अधिवेशनात संयुक्त महाराष्ट्र निर्मितीचा ठराव मांडण्यात आला होता. हैदराबाद संस्थानातील मराठवाडा पोर्तुगीज सत्तेखालील गोमंतक यांचा संयुक्त महाराष्ट्र प्रांत निर्माण करताना मुंबई, मध्यप्रांत,वऱ्हाड, मराठवाडा, गोमंतक यांच्या सरहद्दीवरचे जे मराठी भाषा प्रदेश आज अन्य भाषा प्रांतात समाविष्ट केले गेलेले आहेत ते भाग संयुक्त महाराष्ट्रात समाविष्ट करण्यात यावे."[4] या प्रांतातील मराठी भाषिकांची एकत्रित संयुक्त महाराष्ट्र निर्मितीसाठी संघटना स्थापन करण्यात आली. 28 जुलै 1947 रोजी शंकरराव देव यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र एकीकरण परिषद अस्तित्वात आली होती. या परिषदेत मराठी प्रांत निर्माण करण्यासाठी संयुक्त महाराष्ट्र परिषद ही स्वतंत्र सर्वपक्षीय संघटना निर्माण करण्यात आली. या परिषदेच्या कार्यकारी समितीत समाजवादी पक्षामार्फत ना.ग.गोरे, कामगार नेते कॉम्रेड श्रीपाद डांगे यांचा समावेश करण्यात आला. कॉम्रेड डांगे यांच्या मते, "स्वभाषेत व्यवहार करण्याची गरज व निकड कामगार व शेतकऱ्यांना जास्त असते, शिवाय स्वतःची संस्कृती आणि भूमीसाठी आग्रही असणे हा राष्ट्रीय अस्मितेचा अविष्कार आहे."[5] यावरून शेतकरी कामगार वर्ग, मध्यम वर्ग यांची एकजूट निर्माण होण्यासाठी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र व्हावा असे कॉम्रेड श्रीपाद डांगे यांचे मत होते.



Scanned with OKEN Scanner

**राज्य पुनर्रचना समिती**

जनतेकडून होणारी भाषावार प्रांतरचनेची मागणी लक्षात घेता. त्यावर वेळोवेळी अभ्यास करण्यासाठी शासनस्तरावरून राज्य पुनर्रचना समित्यांची निर्मिती करण्यात आली.

**दार समिती**

घटना समितीने भाषिक राज्याच्या निर्मितीसाठी श्री.एस.के.दार यांच्या नेतृत्वाखाली 1948मध्ये समिती स्थापन केली. या समितीने आपल्या अहवालात पुढील गोष्टी नमूद केल्या.

1. राष्ट्र सध्या आणीबाणी काळात आहे. अशा वेळी भाषावार प्रांत रचना हा मुद्दा गौण असून अन्य बाबींकडे लक्ष देण्याची गरज आहे.
2. भाषा हा एकच घटक म्हणून नवी प्रांत रचना करणे राष्ट्रीय हिताचे नाही.
3. जे घटक राष्ट्रवादाच्या प्रगतीच्या आड येतील त्यांचा त्याग केला पाहिजे. "

भाषिक राज्याची कल्पना राष्ट्रवादाशिवाय टिकू शकत नाही, म्हणून ती स्वीकारता येत नाही. असे दार यांचे मत होते. त्यामुळे दार समितीला देशव्यापी विरोध झाला.

**जे.व्ही.पी. समिती**

दार समितीच्या विरोधाची तीव्रता कमी करण्यासाठी जे. व्ही.पी. समिती नेमण्यात आली. यात पंडित नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल, पट्टाभि सीतारामय्या यांचा समावेश होता. 1948 मध्ये भाषिक प्रश्नांचा विचार करण्यासाठी ही समिती स्थापन करण्यात आली. 1949 मध्ये दिलेल्या अहवालात या समितीने भाषिक पुनर्रचनेची योग्य वेळ नसल्याची शिफारस केली. त्यामुळे भाषावार प्रांतरचनेच्या पुरस्कर्त्यांनी या अहवालास विरोध केला.

**फाजल अली कमिशन**

22 डिसेंबर 1952 मध्ये भाषिक प्रांत प्रश्नांचा पुनर्विचार करण्यासाठी फाजल अली यांच्या अध्यक्षतेखाली आयोगाची स्थापना करण्यात आली. कानडी व्यतिरिक्त कन्नड भाषिक राज्य निर्मितीस प्राधान्य दिले तसेच मराठी व गुजराती भाषिकांचे द्वैभाषिक निर्माण करावी असे या आयोगाने आपल्या शिफारशीत सुचविले. फाजल अली कमिशनच्या शिफारशी देखील जनतेच्या दिशाभूल करणाऱ्या असल्याने जनतेत असंतोष वाढतच होता.

**गिरणी कामगारांची पहिले बलिदान**

राज्य पुनर्रचना या समितीच्या शिफारशी मुळे कामगार व सर्वसामान्य जनतेच्या मनात काँग्रेसविरोधी राग निर्माण झाला. दिल्लीत 7 नोव्हेंबर 1955 रोजी आठ प्रदेशाध्यक्षांच्या बैठकीत किती राज्य पर्यायाला मंजुरी देण्यात आली होती. मुंबई उर्वरित महाराष्ट्र व गुजरात तीन राज्यांची निर्मिती होणार होती.या निर्णयाला महाराष्ट्रातून तीव्र व मोठ्या प्रमाणात विरोध



Scanned with OKEN Scanner

ISSN: 0974-3065

करण्यात आला होता. काँग्रेस श्रेष्ठींनी त्रिराज्याच्या मसुदा कायम करून 18 नोव्हेंबर 1955 रोजी सुरू होणाऱ्या मुंबई विधानसभेच्या अधिवेशनात त्रिराज्य योजनेचा शिक्कामोर्तब करण्याची जबाबदारी मुंबईचे तत्कालीन मुख्यमंत्री मोरारजी देसाई यांच्यावर सोपविण्यात आली होती. यापूर्वीच कॉम्रेड श्रीपाद डांगे यांनी कामगार सभेत "मुंबईच्या विधानसभेच्या बैठकीतले राज्याचा ठराव मांडला जाईल, तेव्हा कामगारांनी या नागरिकांनी आपला आवाज बुलंद करण्यासाठी विधानसभेवर मोर्चा नेण्याची हाक दिली."[7] कॉम्रेड डांगे यांच्या नेतृत्वामुळे कामगारांमध्ये प्रेरणा निर्माण झाली.

18 नोव्हेंबर चा मोर्चा घोषित होताच सेनापती बापट यांच्या नेतृत्वाखाली पाचशे सत्याग्रही दौरा फाउंटन कडे निघाले. आचार्य अत्रे ,मिरजकर, लालजी पेंडसे, मधु दंडवते या कामगार नेत्यांसह सत्याग्रहींना अटक व सुटका करण्यात आली. यानंतर मुख्यमंत्री मोरारजी देसाई व केंद्रीयमंत्री स.का. पाटील यांनी चौपाटीवर सभा घेऊन "जोपर्यंत चंद्र, सूर्य, तारे आकाशात आहे, तोपर्यंत मुंबई महाराष्ट्राला मिळणार नाही. असे प्रक्षोभक विधान केले."[8] यामुळे काँग्रेस विरोधी जनता अधिकच पेटून उठली. त्याचा परिणाम म्हणजे 21 नोव्हेंबर 1955 रोजी गिरणी कामगारांनी मोठ्या संख्येने लाक्षणिक संपास सुरुवात केली. दादर व परळ भागातील हजारो कामगार घोषणा देत निघाले असताना, फ्लोरा फाउंटन जवळ प्रचंड मोठ्या प्रमाणात सशस्त्र पोलिसांचा ताफा तैनात करण्यात आला होता. जुन्या कौन्सिल हॉलला सर्व बाजूंनी हत्यारी पोलिसांनी वेढा घातला होता.

कॉम्रेड बापूराव जगताप, भगिरथ, विनायक भावे यांच्या नेतृत्वाखाली निदर्शकांच्या तुकड्यांनी पोलिसांचे कडे तोडण्याचा प्रयत्न केला, तेव्हा या मोर्चावर पोलिसांनी बेधुंद गोळीबार केला. या गोळीबारात पंधरा माणसे मेली व 400 लोक जखमी झाली. तरी फ्लोरा फाउंटन जवळ व परिसरात गोळा झालेला लाख,दीड लाख लोकांचा जमाव हटायला तयार नव्हता. पोलिसांच्या व प्रशासनाच्या कृत्याचे दर्शन यातून घडते. कामगारांच्या बलिदानाने 22 नोव्हेंबर चा विधानसभेत त्रिराज्याचा ठराव रद्द करण्यात आला.

**गिरणी कामगारांचे दुसरे बलिदान**

16 जानेवारी 1956 रोजी पंडित नेहरूंनी मुंबई शहर केंद्रशासित करण्याचा निर्णय घेतला, तसेच विदर्भासह संपूर्ण मराठी भाषिकांचा महाराष्ट्र आणि सौराष्ट्र कच्छ गुजरात अशी दोन राज्य निर्माण केली जातील. असे जाहीर केले. या निर्णयास कामगारांनी मोठ्या संख्येने विरोध केला. 18 जानेवारी 1956 ला सर्व जिल्ह्यात कारखाने, कचेरी, बँक , कॉलेज बंद ठेवण्यात आले होते. मुंबई बंदमुळे ब्लॉक रुळांवर आलेले रेल्वे वाहतूकही बंद करण्यात आली.



Scanned with OKEN Scanner

 ISSN: 0974-3065

सरकारने सभासदांच्या मिरवणूक बंदी लागू केली. पोलिसांनी बेछूट गोळीबार केला. लोकांची सहनशीलता संपल्याने दगडांच्या व ॲसिडचा मारा सुरू केला. पंधराशे वर लोकांना पकडण्यात आले. पोलीस व जमाव यांच्यात लढाई झाली.

कॉम्रेड श्रीपाद डांगे यांनी संयुक्त महाराष्ट्र परिषदेने साठी दिल्ली वरुन मुंबईला येताच त्यांना अटक करण्यात आली. दिसताक्षणी गोळ्या घालण्याचे आदेश मोरारजी सरकारने दिल्याने 17 जानेवारी ते 20 जानेवारी 1956 पर्यंत हे रणकंदन सुरू होते.याविषयी लालजी पेंडसे म्हणतात, "सरकारच्या या सप्ताहात 74 लोक गोळ्या लागून ठार झाले. समितीच्या अंदाजात हा आकडा 90 आहे. हे 90 व नोव्हेंबर चे पंधरा असे 105 नरबळी मोरारजी मांडलेल्या मोरारजी ने मांडलेल्या 'महाराष्ट्र सभात दिले गेले. व दहा हजारावर लोकांना अटक करण्यात आली."[९] यावरून ब्रिटिश काळातल्या जनरल डायर च्या कृत्याची पुनरावृत्ती मोरारजींनी केली होती.

मोरारजी सरकारने परिणामांचा विचार न करता पोलिसांना आदेश दिले होते.निर्दयीपणे आंदोलकांवर पोलिसांनी गोळीबार केला.कामगारांनीही प्राणाची पर्वा न करता हा लढा सुरूच ठेवला होता. फ्लोरा फाउंटन मधील हुतात्मा स्मारकाच्या रूपाने आजही या लढ्याची साक्ष देत आहे.

## महाराष्ट्राची निर्मिती

कामगारांच्या बलिदानानंतर हा लढा सर्वसामान्य जनता, कामगार, स्त्री व पुरुष यांनी अखंडपणे सुरूच ठेवला होता. त्याची फलश्रुती म्हणजे 1 मे 1960 रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती करण्यात आली. कामगारांनी केलेल्या बलिदानाचे स्मरण व्हावे या हेतूने एक मे हा दिवस महाराष्ट्र निर्मितीसाठी निवडला गेला.

## निष्कर्ष

1.संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत कामगारांना संघटित करून त्यांच्यात महाराष्ट्राविषयी आत्मीयता निर्माण करण्याचे कार्य कॉम्रेड श्रीपाद डांगे, एस. एम .जोशी, आचार्य अत्रे या कामगार नेत्यांनी केले.

2.संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात कामगार वर्गाची योगदान लढाऊ वृत्तीने केलेला विरोध यामुळे संयुक्त महाराष्ट्राचा लढा हा कामगार वर्गाचा लढा होता.

3.संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी कामगार वर्गाने आपल्या प्राणांची पर्वा केली नाही.



Scanned with OKEN Scanner

ISSN: 0974-3065

4.मुंबईसह महाराष्ट्र निर्मिती हे कामगारांच्या दृष्टीने सर्वात मोठी अस्मितेची बाब होती.

5.कामगार चळवळीला योग्य कुशल असे नेतृत्व प्राप्त झाल्यामुळे संयुक्त महाराष्ट्राचा लढा यशस्वी झाला.

### संदर्भ


1. Mishra,K.K.: Linguistics Nationalities in India,Social Scientist Part I,October1972,Page no.20.
2. विसपुते,डॉ. एस.एम.: माणूस नेता -मी एसेम, चेतश्री प्रकाशन,अमळनेर. एप्रिल 2000, पृ.125
3. गडकरी, माधवः संयुक्त महाराष्ट्र लढ्याचे महारथी, मनोविकास प्रकाशन, मुंबई .1 मे 1987 पृ.11
4. उपरोक्त क्रमांक 2 पृष्ठ16
5. न्यू एज साप्ताहिक 1 मे 1960
6. राठी, डॉ. शुभांगी :महाराष्ट्रातील सामाजिक व राजकीय चळवळी, अथर्व पब्लिकेशन्स, जळगाव. पृ.63
7. कॉ. शेट्टे, मधु व इतरः संयुक्त महाराष्ट्र आंदोलनातील कम्युनिस्टांचा सहभाग, कॉम्रेड गोविंद पानसरे अमृत महोत्सव समिती, कोल्हापूर. पृ.30
8. फडके य.दि.,: विसाव्या शतकातील महाराष्ट्र खंड 7, मौज प्रकाशन गृह, मुंबई. 2007 पृष्ठ 59
9. पेंडसे,लालजी:महाराष्ट्राचे महामंथन,लोकवांगमय गृह प्रकाशन, मुंबई.10 जून 2010.पृष्ठ 224




Scanned with OKEN Scanner

Kala Sarovar
(UGC Care Group-1 Journal)
ISSN: 0975-4520
Vol-25 No.01(I) January-March 2022

# ग्रंथालय आधुनिकीकरण काळाची गरज

**श्री राहुल पितांबर जाधव**
ग्रंथपाल, पंकज कला व विज्ञान महाविद्यालय, चोपडा
Email Id:- jadhavrp2@gmail.com

सार:
शैक्षणिक व सामाजिक घटकांच्या माहिती विषयक गरजांची पूर्तता करणे. विविधं प्रकारच्या शैक्षणिकव संदर्भ ग्रंथाचे उपार्जन करून संवर्धन करणे. विविध अभ्यासक्रमांस लागणारे वाचन साहित्य उपलब्ध करून देणे. वाचकांना द्यावयाच्या माहितीचे व संदर्भ सेवांचे नियोजन करणे. पाचवी ते दहावी या वर्गांसाठी शाळेमध्ये विद्यार्थी व शिक्षक यांना जी ग्रंथालये उपलब्ध आहेत, त्यांना शालेय ग्रंथालय असे म्हणतात. आपल्या देशात अलीकडील काळात माध्यमिक स्तरांवर शालेय ग्रंथालये दिसत असली तरी ती शाळेच्या एकूण विद्यार्थी संख्येवर अवलंबून आहेत. शालेय ग्रंथालये ही शाळेतील शिक्षणाला पूरक असे साहित्य विद्यार्थी व शिक्षक यांना पुरविण्याची कामे करतात. यामध्ये क्रमिक व संदर्भ पुस्तकांची देवघेव करणे,विशिष्ट माहिती संदर्भ पुरवणे, ग्रंथालय कसे वापरावे या विषयी मार्गदर्शन करणे, विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी म्हणून अनेक उपक्रमाचे आयोजन करणे.ग्रंथ प्रदर्शने आयोजित करणे. विविध स्पर्धांचे आयोजन करणे. पुस्तकाचे वाचन करणे.चर्चासत्र आयोजित करणे.

**प्रास्ताविक:**

ग्रंथालय चळवळीत निरपेक्ष वृत्तीने आणि सामाजिक कर्तव्यभावनेने कार्य करणारी अनेक मंडळी आहेत. अनेक ग्रंथालये विविध समाजोपयोगी उपक्रम राबवून समाजजीवन समृद्ध करीत असतात. भारत सरकारने नॉलेज कमिशन नेमून ग्रंथालय चळवळीच्या विकासासाठी नवीन धोरण तयार केले.

कालानुरूप ग्रंथालये बदलत गेली. नव्या इमारती झाल्या, ग्रंथसंख्या तर वाढलीच, पण अनेक सांस्कृतिक शैक्षणिक उपक्रमदेखील वाढले. नव्या तंत्राचा वापर करत अनेकांनी संगणकीकरण केले, बार कोड पद्धत सुरू झाली. काही ग्रंथालयांनी जुने ग्रंथ, हस्तलिखिते स्कॅन करून त्याचे ई-बुक देखील केले. स्पर्धा परीक्षांची निकड ओळखून जवळपास प्रत्येक ग्रंथालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र सुरू आहे. But b बदलत्या काळानुसार ग्रंथ संग्रहालये हायटेक होणार आहेत. वाचकांना घरूनच इंटरनेद्वारे कोणते पुस्तक उपलब्ध आहे ते समजू शकेल तसेच पुस्तक घरपोच देखील मिळी शकते. २४ तास सुरू असणारी अभ्यासिकादेखील आहेत.

**ग्रंथालय संगानाकीकरन एक दृष्टीक्षेप :**

आज अस्तित्वात असलेली बहुतेक सर्व ग्रंथालये संगणकीकरणाचा विचार करताना दिसत आहेत. अगदी आता आता काही वर्षापूर्वीपर्यंत अशी परिस्थिती नव्हती. मात्र आता सर्व क्षेत्रांतील संगणकाचा वाढता वापर व त्यापासून होणारा लाभ सर्वांनाच आकर्षित करत आहेत आणि म्हणून आजची ग्रंथालये कात टाकत आहेत असे म्हटले, तर वावगे ठरणार नाही. तसे पाहिले, तर संगणक मुळात गणितीय स्वरूपाच्या समस्या सोडविण्याकरीता शोधलेले एक यंत्र होते. पण आजच्या संगणकाच्या कार्यात ग्रंथालयाचे कार्यही एकवटलेले दिसून येते. संगणक माहिती स्विकारतो, त्यावर प्रक्रिया करतो, त्या माहितीचे जतन करतो व त्या माहितीचे वितरण करण्याकरीता तो सज्ज रहातो; मग ती सांखिकी स्वरूपाची



Scanned with OKEN Scanner

ISSN: 0975-4520
Vol-25 No.01(I) January-March 2022

माहिती असो वा छापील स्वरूपाची! ग्रंथालयांचेही काम असेच आहे. तीही माहिती जमवतात, त्यावर ग्रंथालयीन संस्कार करतात व ती माहिती वाचकांना व्यवस्थित उपलब्ध करून देतात. म्हणजेच ग्रंथालयाचे संगणकाशी सख्य असायला हवे. हे पाहता संगणकीकरणाचा पहिला हक्क ग्रंथालयांनी बजावायला हवा होता. पण प्रत्यक्षात इतर क्षेत्रात हा वापर केव्हाच सुरू झाला, तरी संगणक व नेटवर्कच्या वापरात ग्रंथालये मागे राहिली ही वस्तुस्थिती आहे. आता मात्र लहानमोठी सर्व ग्रंथालये संगणकाचा वापर करून अद्ययावत कार्यप्रणाली अवलंबत आहेत. आजच्या ग्रंथालयीन सेवेत केवळ संगणकाचाच वापर होतो असे नाही, तर मोबाइल, कॅमेरा, स्मार्टकार्ड, स्कॅनर, इ बुक रीडर, अशा अनेक आधुनिक साधनांचा वापर ग्रंथालयात होत आहे. वाचनसाहित्याच्या वर्गीकरणाचे काम तर त्यामार्फत होते आहेच, शिवाय वाचनसाहित्य ग्रंथालयात शोधण्याचे आधुनिक तंत्र विकसित होत आहे. ही सर्व काळाची पुढची पावले आहेत.

**ग्रंथालय समिती व ग्रंथालय कर्मचारी**

हे ग्रंथालयाचा विकास घडवून आणणारे महत्वाचे घटक आहेत. त्यातल्या त्यात ग्रंथपाल हा त्या घटकांचा प्रमुख आधार. ग्रंथालय व माहितीशास्त्रातील उच्च शिक्षणाच्या संधी आज सर्वदूर पोहोचल्याने काही अपवाद वगळता आज जवळजवळ सर्वच ग्रंथालयांना, उच्चशिक्षित ग्रंथपाल व ग्रंथालय कर्मचारी सहज उपलब्ध होत आहेत. बदलत्या वाचकांच्या गरजेनुसार ग्रंथालय शास्त्राच्या अभ्यासक्रमात सुद्धा अनुषंगिक बदल त्वरित केले जात आहेत. माहिती तंत्रज्ञान जेवढ्या गतीने विकसित होत आहे, त्याहीपेक्षा अधिक गतीने ग्रंथालय माहितिशास्त्र अभ्यासक्रम व प्रशिक्षण कार्यक्रमात बदल करण्याचा आटोकाट प्रयत्न केला जात आहे. गेल्या दहा वर्षांत भारतभर आयोजित केलेल्या, भरवलेल्या परिषदांचे, चर्चासत्रांचे, प्रशिक्षणाचे विषय पाहिल्यास आपल्याला असे दिसून येईल, की ९९ टक्के परिषदांचे, चर्चासत्रांचे, प्रशिक्षणाचे विषय आधुनिकतेकडेच झुकलेले आहेत. प्रचलित ग्रंथालयांचे रूपांतर 'ग्लोबल नॉलेज सेंटर्स'मध्ये होण्याच्या दृष्टीने या सर्व महत्वपूर्ण घटना आज घडताना दिसत आहेत.

**ग्रंथालय आधुनाकीकारणात शासनाची भूमिका:**

ग्रंथालयांच्या आधुनिकीकरणात शासनाचेही योगदान सध्या दिसून येत आहे. प्रत्येक जिल्ह्यात डिजिटल ग्रंथालय व त्याकरीता आवशक त्या सोयी उपलब्ध करून दिल्या जात आहेत. सध्या त्या अपुऱ्या जरी वाटत असल्या, तरी सुरुवात तरी झाली आहे, हे ही नसे थोडके. ग्रंथालय संगणकीकरणाकरीता केंद्र शासनाच्या नॅशनल इन्फॉर्मेटिक सेंटर (NIC)ने तयार केलेली संगणकीय प्रणाली मागेल त्या ग्रंथालयांना कसलेही शुल्क न आकारता दिली जाते. त्या प्रणालीच्या प्रशिक्षणाचे वारंवार आयोजन केले जाते. ग्रंथालय संगणकीकरणात येणाऱ्या समस्यांवरचा उपाय त्वरित ऑनलाइन सापडतो. आज अनेक ऑनलाइन फोरम उपलब्ध आहेत आणि ते सदैव मदत करत असतात.

ग्रंथालय संगणकीकरणकरीता शासकीय स्तरावर जेवढे प्रयत्न केले जात आहेत, त्यापेक्षा अधिक व्यावसायिक पातळीवर केले जात आहेत. आज देशभरात पाचशेपेक्षा जास्त ग्रंथालय संगणकीय प्रणाली उपलब्ध आहेत. त्यात ग्रंथालयातील सर्व व्यवस्थापकीय कौशल्यांचा फार बारकाईने समावेश केलेला आढळतो. बदलत्या स्वरूपातील वाचन साहित्याची मागणी तरुण वाचकवर्ग करत आहेत. आधुनिक सेवा देताना येणाऱ्या अडचणींवर मात करण्याची क्षमता स्थानिक पातळीवर उपलब्ध होऊ शकते अशी आज परिस्थिती झाली आहे.



Scanned with OKEN Scanner

ISSN: 0975-4520
Vol-25 No.01(I) January-March 2022

आज संगणकीकृत झालेली आहेत. शासन सर्वच ग्रंथालयांना मदत करेल, ही शक्यता गृहीत धरली तर फार विलंब लागण्याची शक्यता आहे. छोट्या ग्रंथालयाचे संगणकीकरण लवकर होऊ शकते. लहान ग्रंथालयांनी असा विचार केला, की आपले ग्रंथालय अजून लहान आहे, मग आत्ताच कशाला पैसा खर्च करायचा तर त्यात अंतिमतः त्यांचाच तोटा आहे. नीट विचार केला, तर असे लक्षात येईल की पूर्वलक्षी रूपांतरणाचे कार्य चांगले व झटकन होऊ शकते, ते केवळ संख्येने कमी असलेल्या वाचनसाहित्यामुळे. जसजशी पुस्तकांची, संदर्भग्रंथांची, कागदपत्रांची, फायलींची, नोंदबुकांची संख्या वाढत जाते, तसतसा कामाचा व्याप व बारकावे वाढत जातात. आतापासून सुरुवात केली, तर कामाचा आवाका कमी होईल आणि भविष्यात ग्रंथालयांचा पसारा वाढायला हातभारच लागेल. या नव्या आधुनिक प्रवाहाचा सर्व प्रकारच्या ग्रंथालयांनी सध्या उपयोग करून घेतलाच पाहिजे. भविष्यात अजून चांगल्या संधी यामुळे प्राप्त होणार आहेत.

आगामी काळातील ग्रंथालयांची भूमिका

अध्ययन व अध्यापन प्रक्रियेत शैक्षणिक ग्रंथालयांची महत्वाची भूमिका आहे. विद्यार्थ्यांमध्ये ग्रंथालय बाबत जागरूकता होण्यासाठी सामाजिक माध्यमांचा उपयोग हा करता येईल.

१. Integration of Online Hybrid and Collaborative Learning : आगामी काळात ओनलाईन, हायब्रीड व सह अध्ययनाचे मोठ्या प्रमाणात एकत्रीकारण होईल असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. या नवीन प्रवाहामुळे उच्च शिक्षणात व्यापक प्रमाणात बदल होतील असेही तज्ञांचे मत आहे.
२. शैक्षणिक ग्रंथालयांचा प्रतिसाद : अध्ययन व अध्यापन प्रक्रियेत शैक्षणिक ग्रंथालयांनी नेहमीच महत्वाची भूमिका बजावलेली आहे व आगामी काळात देखील चांगली भूमिका टे बजावणार आहेत.आता नवीन प्रकारच्या ओनलाईन, हायब्रीड सेवांमध्ये देखील ग्रंथालयांचे महत्व आहे.तंत्रज्ञानामुळे ग्रंथालयीन क्षेत्रात मोठे बदल होत आहेत त्यातील विशेष बदल हे पुढील प्रमाणे होवू शकतात.
३. व्यापक ओनलाईन मुक्त अभ्यासक्रमांची उपलब्धता: हार्वर्ड एम आय. टी अशा जगप्रसिद्ध संस्थांनी असे अभ्यासक्रम उपलब्ध केले आहेत. हे अभ्यासक्रम मोफत व ओनलाईन देखील उपलब्ध आहेत.MOOC अभ्यासक्रमानं लागणारे वाचानसाहित्य हे अभासाकाना मोफत उपलब्ध करून दिले जाते. .MOOC अभ्यासक्रम हे आगामी काळात महत्वपूर्ण भूमिका बजावतील.
४. मुक्त शैक्षणिक साधनांची उपलब्धता ( Open Education Resources ) : अनेक संस्था तसेच तज्ञ शैक्षणिक साधने जसे ग्रंथ, audio visual साधने हे ऑनलाईन पद्धतीने उपलब्ध करून देण्यात येत आहे. हि शैक्षणिक साधने हि मोफत उपलब्ध आहेत.

   ग्रंथालये वाचानसाहित्य उपलब्ध करतात व वाचान्साहीत्याची उपलब्धता मोफत उपलब्धता हि वरील दोन्ही नवीन सुविधांचे वैशिष्ट्य आहे. तंत्रज्ञानाच्या या वादळांमध्ये ग्रंथालय टिकून राहतील का? आगामी काळात त्यांचे महत्व कमी होणार आहे परंतु बदललेल्या परिस्थितीत सुद्धा ग्रंथालयांचे महत्व हे अबाधित राहील. शैक्षणिक ग्रंथालये ऑनलाईन व हायब्रीड शिक्षण पद्धतीत आपले महत्व अधोरेखित करत आहेत.

५. लवचिक शिक्षण पद्धतीचा अवलंब: आगामी काळात लवचिक अध्ययन संकल्पनेचा मोठ्या प्रमाणावर अवलंब केला जाईल असा अंदाज आहे. गरजा आधारित शिक्षण व्यवस्था हि अंगिकारली जाईल या शिक्षण पद्धतीत पारंपारिक शिक्षण पद्धती ऐवजी तंत्रज्ञानावर आधारित शिक्षणावर भर दिला जातो. यासाठी शिक्षणिक



Scanned with OKEN Scanner

ISSN: 0975-4520
Vol-25 No.01(I) January-March 2022

ग्रंथालयांनी त्यांचे लवचिक ग्रंथालयात ग्रंथालयात रुपांतर करावे लागेल . यासाठी ग्रंथालयांनी त्यांच्या कामकाजाच्या वेळेमध्ये, सभासदत्वाच्या नियमाणमध्ये, इलेक्ट्रोनिक डेटाबेस व एक्सेस करण्याच्या नियमांमध्ये लवचिकता आणली पाहिजे.लवचिक युगात ग्रंथपालनी केवळ ग्रंथपाल एवढी एकच भूमिका न बजावता विविध भूमिका बजावल्या पाहिजेत. जसे डेटाबेस तज्ञ, वाचन सल्लागार वाचानसाहित्य वापरण्या बाबत लेखन सल्लागार या सारखी कामे करावी लागणार आहेत.

६. **ग्रंथालय हे उत्पन्नाचे साधन बनले आहे (The library has become a source of income)**
आज सुशिक्षित लोकांना नोकरी मिळत नाही, त्यांना रोजगार मिळत नाही, अशा लोकांनी त्यांच्या शिक्षणाचा योग्य वापर केला आहे. आपण असे अनेक लोक पाहिले आहेत ज्यांनी त्यांच्या शहर आणि प्रदेशात गरजेनुसार ग्रंथालये बांधली आहेत. याच्या मदतीने तो आपले उत्पन्न वाढवण्यातही यशस्वी झाला आहे. आज ग्रंथालय अभ्यासासाठी एक चांगले ठिकाण आहे. आज अनेक शहरांमध्ये तुम्हाला एकापेक्षा जास्त ग्रंथालये पाहायला मिळतील. जर तुम्ही देखील बेरोजगार असाल तर तुम्ही लायब्ररीला तुमचा रोजगार बनवू शकता.

**संदर्भ**

पवार एस. पी. ग्रंथालय व माहितीशास्त्र ,पुणे, फडके प्रकाशन.
कोन्नुर, सुजाता (२००९), माहिती तंत्रज्ञान, पुणे, डायमंड पब्लिकेशन.
फडके, द.ना.(२००७), ग्रंथालय संगणकीकरण आणि आधुनकीकरण, युनिवर्सल प्रकाशन, पुणे.
K.lal, library automation, ess publication, pune.



Scanned with OKEN Scanner

**Journal**
of the
**Oriental Institute**
M.S. University of Baroda
ISSN: 0030-5324

# IMPACT OF COVID -19 ON INDIAN ENVIRONMENT

**Mr. Ajay D. Patil** Asst. Professor, Dept. of Geography Pankaj Arts and Science College, Chopda

## INTRODUCTION

The Global outbreak of covid-19 which has an affected human life significantly but also had a greater impact on the environment which factor waited to take a deep breath. The outbreak of corona virus disease-2019 (COVID-19) first emerged at the end of December 2019, from the seafood market in Wuhan City of China, and declared as an international public health emergency in a couple of weeks by the World Health Organization. The transmission of the virus mainly occurred through person-to-person via direct contact or droplets produced by coughing, sneezing and talking. Therefore in order to prevent the spread of disease, the government imposed lock down under section 269 and 271 of Indian penal code which restricted the movement of almost all mankind activities and shut down all economic activity except Medicare agencies. The impact of covid-19 lockdown on environment changes the efficiency of government measures to control the moment population of the area state or country rate of spread of covid-19 and waste disposal mechanism followed in each area. After many decades the largest Ozone hole above Arctic heals itself during covid-19 lockdown but it's not heal 100%. It's a good signal to watch reduction in pollution level due to measures taken to curfew covid-19 infection few scientist consider that if germs are accumulated in air then how can it be considered as pollution free air as jumps are also considered as pollutants. While comparing between India and China with the help of Geneva green report it was found that Chinese do not with less a significant rise in quality of environment.

COVID-19 and Biodiversity an ecosystem needs three kinds of diversity namely biological, genetic and functional. Biological diversity refers to the richness of species in a particular area; genetic diversity refers a way for a particular species to adapt itself to changing environments while functional diversity equates to the biophysical processes that happen within the area. The genetic diversity acts as a buffer for biodiversity. Humans should understand the levels and values of biodiversity for the greater interest of the globe. Biodiversity or biological diversity refers to the existence of a wide variety of plant and animal species in their natural environments or the diversity of plant and animal life in a particular habitat. The biodiversity is usually described at three levels: (a) genetic diversity, (b) species diversity and (c) ecosystem diversity. There is a necessity of ecological balance for widespread biodiversity.

Anthropogenic activities and unsustainable agriculture have multiple effects and disturb the ecological balance. The ecological balance is an indispensable need for human survival. Without conserving the biodiversity and minimizing the anthropogenic activities, it is almost impossible to get the inclusive and sustainable development. The sustainable development is directly related with environmental ethics and sometimes it seems to rethink and redefine the environmental ethics in modern context. The climate change has huge impact on biodiversity. Today, the World is a 'global village' due to the use of Information and Communication Technology and we are living there and deriving all the benefits from Nature. When we are deriving the benefits, we must have to bear some responsibilities. We have to develop environment centric approach to utilize the natural resources in such a manner so that we can achieve the inclusive and sustainable development with coexistence of all other species of organisms of the globe. The lockdown therefore provided us an opportunity to shift our ideology from anthropocentric or human centric worldview to eco-centric worldview. The former worldview puts the human beings in the centre giving them the highest status, considers man to be the most capable for managing the planet earth, realizes that man is the planet's most important



Scanned with OKEN Scanner

species and is the in-charge of the rest of nature. It emphasizes that earth has unlimited resources for humans only and a healthy environment depends upon a healthy economy. The later worldview states that the earth resources are limited and belong to all the species that exist in nature. Though humans have right to draw their requirements from the environment but certainly not the extent that degrades the environment and harms other species and living beings. This eco-centric worldview is therefore based on earth-wisdom and urges us to live on this earth as a part of it, like any other creature of nature and live sustainably. It realizes that healthy economy depends upon a healthy environment.

**Various Effects**:

- **Protection of public services:** Increasing people's resilience to climate change involves effective, efficient and resilient provision of public services such as clean water, wastewater treatment, and energy for heating or cooling, health services and access to information for anticipatory responses. Many developing countries already face low capacity to provide and access such services adequately. Thus, investing in and increasing protection of these services will increase social and environmental protection and generate jobs – outcomes that are needed for Covid-19 recovery.
- **Infrastructure:** CCA actions involve building retrofits, and are encouraged in the medium term as they provide jobs, cut costs and often reduce carbon emissions through efficiency gains. These benefits are needed in the Covid-19 recovery. Large-scale infrastructure investments are another option to guarantee similar benefits, but can take 5–10 years to plan and implement, and depend on the capacity of the corresponding country to carry them out, which often is low in developing countries.
- **Nature-based solutions:** These are likely to become a focus of resilience-building in the long term as they are labor-intensive and thus create jobs (although gender considerations must be taken into account).
- **Tourism:** One example of adaptation investments with the potential to be showcased post Covid-19 is ecosystem-based solutions for eco-tourism. As the tourism sector has been hard hit in many developing countries that depend on its revenue, and is particularly exposed to natural hazards, such investment could help to build resilience and increase job opportunities

**COVID-19 and Global Warming**

With the beginning of civilization, human beings gradually manipulating the nature for his own benefit. For completing the demand of population; industrialization and urbanization became inevitable, and it was proved to be the global climatic changes. The desire to drive the nature as per their own whims and desire, human beings started to destroy the nature in numerous ways by anthropogenic activities without caring for sustainable development. As an inevitable consequence, environmental pollution has become a big issue of the present day. It is obvious that environmental pollution will change the distribution and burden of various vector borne infectious diseases including bacterial and viral diseases.

**Effect on Climate**

The growing consequences of climate change have been all too visible across the world this year with severe heat waves, floods, wildfires, and tropical cyclones. A new assessment of the science by the Intergovernmental Panel on Climate Change (IPCC), published in August 2021, concluded that there is now a clear link between rising greenhouse gas concentrations in the atmosphere and increases in the frequency and intensity of extreme weather events.2 It states: "Climate change is already affecting every inhabited region across the globe, with human influence contributing to many observed changes in weather and climate extremes."

Although the IPCC's review of the effects of climate change on people and wildlife is not due to be published until next year, losses are clearly mounting around the world. One of the great injustices of climate change is that the poorest people around the world are often most exposed and



Scanned with OKEN Scanner

vulnerable to the effects, even though they are least responsible for the driving cause: the rise in concentrations of carbon dioxide and other greenhouse gases in the atmosphere.

**Effect on Greenhouse Gas Emissions:**

Prior to the COVID-19 pandemic, global greenhouse gas emission levels were rising at around 1% per year over the previous decade, with no changes in 2019. Despite significant gains in renewable energy technology, the primary source of energy was restricted to fossil fuel usage. A study of the energy, activity and policy data available up to April 2020 was utilized to identify daily emission changes due to COVID 19 pandemic. It was found that across 69 countries, daily carbon dioxide emissions declined by 17%, from January to April 2020, compared to the mean 2019 levels. At the peak, emissions in individual countries decreased by 26% on average. Of this, the largest reduction was found in China, followed by the US, Europe and India, respectively.3 For India, specifically, COVID-19 led to the first year on year drop in GHG emissions in 4 decades. Due to reduction in coal & oil consumption demands.

**CONCLUSION:**

The corona has proved that although humans are a superpower and have weapons that are capable to destroy the whole world but still if humans are creating mess with nature then even now nature is itself powerful to destroy humans with this small virus which is having very common symptoms like cold and cough. The best way to prevent and hamper transmission is to protect yourself and others from infection by frequent washing of hands or using an alcohol based- rub frequently, not touching the face and follow social distancing norms. Use of mask is beneficial if anyone has to go out of home due to an urgent work. During the lockdown, staying at home and working from home should be followed.

**References -**


1. Gautam, Mayur, Sneha Kumari, Shrestha Gautam, Ranjay Kumar Singh, and R. S. Kureel. 2020. "The Novel Corona virus Disease-COVID-19: Pandemic and Its Impact on Environment.
2. ] Ankita A. and Sangeeta A. (2020). Outbreak of Novel Corona Virus in India: Lethal Pandemic. Acta Scientific Agriculture. 4(5): 44-45.
3. [2] Kumari T. and Shukla V. (2020). Covid-19: Towards confronting an unprecedented pandemic. International Journal of Biological Innovations. 2(1):1-10.
4. Singhal T. (2020). A review of corona virus disease-2019 (COVID-19). The Indian Journal of Pediatrics. Published online.
5. Verma A.K. (2017b): Necessity of Ecological Balance for Widespread Biodiversity. Indian Journal of Biology. 4(2):158-160.




Scanned with OKEN Scanner